




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६४ वे * अंक १८० * नांदेड * रविवार, दि. ६ जुलै २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# राज आणि उद्धव ठाकरे तब्बल २० वर्षांनी एकत्र

## राज ठाकरेंचा हल्लाबोल तर उद्धव ठाकरे म्हणाले एकत्र राहण्यासाठी एकत्र आलो



**मुंबई (प्रतिनिधी)–** संपूर्ण राज्यालाच नाही तर अगदी दिल्लीपर्यंत ज्याची उत्सुकता होती, तो ठाकरे बंधूंचा मेळावा दि. ५ जुलै रोजी मुंबईतील एनएससीआय डोममध्ये साजरा करण्यात आला. विजयी मेळाव्याच्या निमित्ताने तब्बल १९ वर्षांनंतर एका व्यासपीठावर एकत्र दिसले. दुपारी १२.१५ च्या दरम्यान राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांची स्टेजवर ग्रँड एन्ट्री झाली. ठाकरे बंधूंच्या एन्ट्रीसाठी संपूर्ण डोममधील लाईट बंद करण्यात आली होती आणि राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंवर फक्त फोकस लाईट ठेवण्यात आली. हा ऐतिहासिक क्षण मोबाईलमध्ये टिपण्यासाठी उपस्थितांनी फ्लॅशलाईटसह व्हिडीओ घेतले. स्टेजवर दाखल होताच राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंनी एकमेकांना मिठी मारली. यावेळी संपूर्ण महाराष्ट्र भावूक झाल्याचं दिसून आलं.

यावेळी बोलताना राज ठाकरे म्हणाले की, मोर्चा निघायला पाहिजे होता. मराठी माणूस एकवटतो याचं चित्र उभा राहीलं असतं. नुसत्या मोर्चाच्या चर्चेने माघार घ्यावी लागली. कोणत्याही वादा पेक्षा महाराष्ट्र मोठा आहे म्हणून उद्धव ठाकरे आणि मी एकत्र आलो आहे. आम्हाला एकत्र आणायचं बाळासाहेब ठाकरे यांना जमलं नाही, कुणालाच जमलं नाही. ते देवेंद्र फडणवीसांना जमलं. आजचा मेळाव्याला घोषणा हीच आहे, कोणताही झेंडा नाही मराठी हाच अजेंडा. मराठीकडे कुणी वाकड्या नजरेने पाहायचं नाही, असा इशारा राज ठाकरेंनी दिला. तसेच तुमच्याकडे विधानभवनात सत्ता आहे. आमच्याकडे रस्त्यावर सत्ता आहे, असं राज ठाकरे म्हणाले. एक भाषा उभी करायला प्रचंड ताकद लागते. भाषा अशाच उभ्या राहत नसतात. अमित शाह म्हणतात ज्याला इंग्रजी येतं त्याला लाज वाटेल इंग्रजी येते म्हणून. पण तुम्हाला कुठे येते? आम्ही मराठी भाषा कधी लादली का?, हिंदी फक्त २०० वर्षे पूर्वीची आहे, असंही राज ठाकरेंनी सांगितले.

यावेळी बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, बऱ्याच वर्षांनंतर राज आणि माझी राजकीय व्यासपीठावर भेट आहे. राज ठाकरेंनी माझा सन्मानीय उद्धव ठाकरे असा उल्लेख केला. मी देखील सन्मानीय राज ठाकरे असा उल्लेख करतो. राज यांनी अतिशय चांगली मांडणी केली आहे. आजच्या भाषणापेक्षा आमच एकत्र दिसणं महत्वाच आहे. आमच्या दोघांतील 'अंतरपाट' अनाजी पंतांनी दूर केला. आता अक्षता टाकायची गरज नाही. एकत्र आलो आहे, एकत्र राहण्यासाठी, असं विधान उद्धव ठाकरेंनी केलं. मला आज कल्पना आहे, अनेक बुवा महाराज बिझी आहे, कोण लिंबु कापतय कोण रेडा कापतोय. माझा आजोबांनी या भोंदूपणा विरोधात लढा दिला होता आणि त्यांच्यासाठी आम्ही एकत्र आलो आहे. वापरायचं आणि फेकून द्यायचं, असं यांचं काम आहे. आता आम्ही दोघे तुम्हाला फेकून देऊ. तुमच्या डोक्यावर बाळासाहेब ठाकरे यांचा हात नसतं तर कुठे असता?, मधल्या काळात यांनी सुरू केळं होतं उद्धव ठाकरे यांनी हिंदुत्व सोडलं. अरे आम्ही कडवट देशाभिमानी मराठी हिंदू आहोत, असं उद्धव ठाकरेंनी ठणकावून सांगितले.

### श्रेय मला दिल्याबद्दल आभार –देवेंद्र फडणवीस

मी राज ठाकरे यांच्या आभार मानतो. त्यांनी दोन्ही बंधू एकत्र येण्याचे श्रेय त्यांनी मला दिले. त्यामुळे बाळासाहेब ठाकरे यांचे आशीर्वाद मलाच मिळत असतील. पण मला असं सांगण्यात आलं होतं विजय मेळावा होणार आहे, पण त्या ठिकाणी भाषण रुदाली देखील झालं आणि मराठी बद्दल एक शब्द न बोलता, केवळ आमचं सरकार गेलं, आमचं सरकार पडलं, आम्हाला सरकारमध्ये द्या. आम्हाला निवडून द्या. हा मराठीचा विजय उत्सव नव्हता. ही रूदाली होती, त्याचं दर्शन दिसून आलं आहे, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

# आजचा मेळावा म्हणजे द्वेष, जळजळ, मळमळ

## उपमुख्यमंत्री शिंदेचा राज-उद्धव मेळाव्याला टोला



**मुंबई (प्रतिनिधी)–** उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे २० वर्षांनी एकाच व्यासपीठावर दिसले. सरकारने हिंदी सक्तीचा निर्णय मागे घेतल्यानंतर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे या दोन्ही बंधूंनी एकत्र सभा घेतली. या विजयी मेळाव्याच्या निमित्ताने दोन्ही ठाकरे बंधू १९ वर्षांनी एकत्र आले. त्यामुळे आता आगामी काही दिवसांत होणाऱ्या मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत नेमकं काय होणार? असा प्रश्न विचारला जात आहे. असं असतानाच आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या विजयी मेळाव्यावर प्रतिक्रिया दिली. राज ठाकरे यांच्या भाषणात मराठी विषयीची तळमळ दिसली पण उद्धव ठाकरेंच्या भाषणात सत्तेची, स्वार्थाची मळमळ दिसली, असा हल्लाबोल शिंदे यांनी केला आहे.

पुढे ते म्हणाले, आजचा मेळावा हा मराठी भाषेसाठी, मराठी माणसांसाठी असल्याचे सांगितले जात होते. पण ठाकरे यांच्या भाषणात आगपाखड होती. द्वेष, जळजळ, मळमळ होती. हे सगळं त्यांच्या भाषणात दिसून आलं. मराठी माणूस मुंबईच्या बाहेर का फेकला गेला? मुंबईतील मराठी लोकांचे प्रमाण का होत गेले. मराठी माणूस वसई-विरार, नालासोपारा, बदलापूर, अंबरनाथ, वांगणी इथपर्यंत का बाहेर गेला? असा रोखठोक सवाल यावेळी शिंदे यांनी केला.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी केलेल्या भाषणावरही प्रतिक्रिया दिली. राज ठाकरे यांच्या भाषणात मराठी माणसासाठी असलेली तळमळ दिसली. तर उद्धव ठाकरे यांच्या भाषणात सत्ता आणि खुर्चीसाठीची मळमळ दिसली, अशी टीका शिंदे यांनी केली. उद्धव ठाकरे माझ्यावर सातत्याने टीका करत असतात. पण मी त्यांच्या टीकेला उत्तर देत नाही. मी कामातून उत्तर दिलं. त्यामुळेच मी मुख्यमंत्री झालो. अडीच वर्षांनी झालेल्या निवडणुकीतही आमचा मोठा विजय झाला, अशी उदाहरणं देत जनतेने उद्धव ठाकरेंना नाकारलं असं एकनाथ शिंदेंनी यांनी म्हटलंय.

तीन वर्षांपूर्वी आम्ही त्यांना 'धो डाला' त्यामुळे 'उठेगा नाही साला' हा डायलॉग उद्धव ठाकरे यांना शोभून दिसतो. ३ वर्षांपूर्वी आम्ही उठाव केला, अन्यायाविरोधात आवाज उठवला. तेव्हा दाढीवरून अर्धाच हात फिरवला होता. त्याने ते आडवे झाले, अजून सावरले नाहीत. आता कुणाचा तरी हात पकडून उठण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे 'उठेगा नही' वगैरे हे त्यांना शोभून दिसते. काही गोष्टी करण्यासाठी मनगटात जोर लागतो, फक्त तोंडाच्या वाफा दवडून होत नाही. मी एवढेच सांगेन की एकाने मराठीबद्दल असलेली तळमळ बोलून दाखवली आणि दुसऱ्याने सत्तेसाठी आणि खुर्चीसाठी असलेली मळमळ बोलून दाखवली. 'झेंडा नाही, अजेंडा नाही' असा काही लोकांनी म्हटलं होतं, पण ते एकानेच पाळले; दुसऱ्याने स्वार्थाचा झेंडा आणि सत्तेचा अजेंडा दाखवला, अशी टीका एकनाथ शिंदे यांनी केली.


गोदातीर समाचार



### आज आषाढी एकादशी

सुट्टीची सूचना

आज आषाढी एकादशी! यानिमित्त कार्यालयास सुट्टी असल्याने उद्या दि. ७ जुलै २०२५ चा गोदातीर समाचारचा अंक प्रकाशित होणार नाही. वाचक, जाहिरातदार, एजंट यांनी याची नोंद घ्यावी.

–व्यवस्थापक


# पुंछमध्ये दहशतवादी अड्डा नष्ट, शस्त्रसामुग्री जप्त

**जम्मू (प्रतिनिधी)–** जम्मू-काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यात शनिवारी सुरक्षा दलांनी दहशतवाद्यांचा अड्डा नष्ट केला. पोलिस आणि सैन्याने संयुक्तपणे सुरणकोटच्या जंगलात राबवलेल्या मोहिमेत हा अड्डा आढळून आला.

यासंदर्भातील माहितीनुसार सुरक्षा दलांनी जंगलातील या अड्ड्यातून ३ हातबॉम्ब, एके रायफलच्या १४ गोळ्या, पिस्तूलच्या ६ गोळ्या, वायर कटिंग टूल, एक चाकू, डेटा केबल कनेक्टर, ५ पेन्सिल सेल, एक लोखंडी रॉड आणि एक पेंट बॉक्स जप्त करण्यात आला. या कारवाईत कोणालाही अटक करण्यात आलेली नाही.

त्याचवेळी, किश्तवार जिल्ह्यातील चतरू जंगलात दहशतवादाविरुद्धची कारवाई चौथ्या दिवशीही सुरू आहे. बुधवारी संध्याकाळी सुरू झालेल्या या कारवाईत, सुरक्षा दलांनी दहशतवाद्यांशी सामना केला आणि अनेक तास गोळीबार सुरू राहिला. अंधार, घनदाट जंगल आणि कठीण भूभागामुळे दहशतवादी पळून गेले. त्यांच्या शोधासाठी अजूनही शोध मोहीम सुरू आहे.

# राज्यात ९ जुलैपर्यंत वादळी वाऱ्यासह तुफान पावसाचा अंदाज



**मुंबई (प्रतिनिधी)–** अरबी समुद्रात तयार झालेल्या चक्रकार वाऱ्यांमुळे महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढणार आहे. राज्यात ९ जुलैपर्यंत वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. कोकण, मध्य महाराष्ट्रातील घाटमाथ्यावर तसेच मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी जोरदार पावसाची हजेरी राहील. रविवारी तळ कोकणापासून संपूर्ण किनारपट्टी भागात पावसाचे ऑरेंज अलर्ट आहेत. मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरावर जोरदार पावसाची शक्यता आहे. उत्तर महाराष्ट्र व मराठवाड्यात अनेक ठिकाणी पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला. आज दि. ६ जुलै रोजी नांदेड जिल्ह्याला येलो अलर्ट देण्यात आला आहे.

प्रादेशिक हवामान केंद्र व पृथ्वी मंत्रालयाने एकत्रितपणे जाहीर केलेल्या ताज्या हवामान अंदाजानुसार ९ जुलैपर्यंत महाराष्ट्रात सर्वदूर पावसाचा इशारा देण्यात आला. अरबी समुद्रात तयार झालेल्या चक्राकार वाऱ्यांमुळे पश्चिम बंगाल व आजूबाजूच्या परिसरात कमी दाबाचा पट्टा तयार झाला. याचा परिणाम महाराष्ट्रावरही होणार असून कोकण, मध्य महाराष्ट्र तसेच मराठवाड्यात पुढील चार दिवस वादळी वाऱ्याच्या पावसाची हजेरी राहणार आहे. यावेळी ४५ ते ५५ किलोमीटर वेगाने वारे वाहतील. रविवार व सोमवार (६ व ७ जुलै) रोजी पुणे घाटमाथ्यावर पुन्हा एकदा रेड अलर्ट देण्यात आला. संपूर्ण कोकण किनारपट्टी उत्तर महाराष्ट्र व विदर्भात पुढील चार दिवस पावसाचा जोर वाढणार आहे.

# मनसेने सुशील केडियाचं ऑफिस फोडलं

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य करण्याच्या मुद्द्यावरून सुरू झालेल्या वादाने आता मराठी विरुद्ध अमराठी असं रूप घेतलं आहे. त्यातच मराठीत न बोलल्याने मीरारोड येथे एका दुकानदाराला मारहाण करण्यात आल्याची घटना नुकतीच घडली होती. त्या पार्श्वभूमीवर आता एक प्रसिद्ध व्यावसायिक आणि केडियोनॉमिक्सचे संस्थापक सुशील केडिया यांनी मराठीप्रेमींना डिवचणारं विधान केलं होतं. त्यानंतर अनेक मराठीप्रेमींनी राग व्यक्त केला होता.

मी मराठी शिकणार नाही, काय करायचं ते करा, असे केडिया यांनी एक्सवर शेअर केलेल्या एका पोस्टमध्ये मनसेप्रमुख राज ठाकरे यांना टॅग करत म्हटलं होतं. सुशील केडियाच्या या विधानानंतर आज सुशील केडिया यांचं मुंबईतील ऑफिस फोडल्याची माहिती समोर आली आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचा मुंबईत विजयी मेळावा सुरु होण्याआधी खळखट्याक आवाज आला आहे. सुशील केडिया यांचं ऑफिस तोडण्यात आलं आहे. त्यामुळे सोशल मीडियावर मराठी लोकांनी केडियांचा माज उतरवला अशा पोस्ट व्हायरल होत आहे.

### चुक झाली, माफी मागतो –केडिया

तणावाखाली आणि मानसिकता ठीक नसताना मी ट्विट केलं. आता वादातून लाभ मिळवण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या लोकांकडून त्याचा गैरअर्थ काढला जातोय. मराठी न येणाऱ्यांविरोधातला हिंसाचार पाहून मानसिक दबावाखाली येऊन मी ओव्हररिॲक्ट केलं. मी राज ठाकरेंचा प्रशंसक आहे. ओव्हररिॲक्ट करताना माझ्याकडून चूक झाली. मराठी शिकण्यासाठी भीतीऐवजी प्रोत्साहन द्या. माझी चूक स्वीकारतो आणि माफी मागतो, सुशील केडिया म्हणाले.

# 'निर्मल दिंडी'च्या माध्यमातून संतांचे संदेश प्रत्यक्षात उतरविण्याचे काम –मुख्यमंत्री

**पंढरपूर (प्रतिनिधी)–** सर्व संतांनी निसर्गप्रेम आणि स्वच्छतेचा संदेश दिला आहे, आपल्या नद्या, निसर्गांवर प्रेम करायला शिकवले आहे. त्यामुळे विठुमाऊलीच्या दर्शनाला येताना त्यांचा संदेश प्रत्यक्षात उतरविण्याचे काम निर्मल दिंडीच्या माध्यमातून वारकरी करतात, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. ते पंढरपूर येथे राज्य महिला आयोगाच्या कार्यक्रमात बोलत होते.


पुढे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, लाखो वारकरी विठुरायाच्या दर्शनाची आस लाऊन पंढरपूर येथे पोहोचतात. वारी दरम्यान वारकऱ्यांना येणाऱ्या अडचणीचा विचार करुन २०१८ वर्षीपासून निर्मलवारीची सुरुवात केली. याअंतर्गत पालखी मुक्कामाच्या ठिकाणी स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात आली. सर्व दिंडीमधील वारकऱ्यांनी या संकल्पनेचा स्वीकार केला, त्यामुळे पालखी तळावर घाणीचे साम्राज्य दिसत नाही. महिलांची मोठ्या प्रमाणात सोय झाल्यामुळे वारीमध्ये त्यांची संख्या वाढलेली आहे. आपली वारी निर्मल, स्वच्छ झाली आहे.

# शुभमन गिलचे पहिल्या डावात द्विशतक दुसऱ्या डावात शतक



**बर्मिंघम (वृत्तसंस्था)–** भारताचा कॅप्टन शुभमन गिल यानं इतिहास रचला आहे. शुभमन गिलनं पहिल्या डावात २६९ धावा केल्या तर दुसऱ्या डावात शुभमन गिलनं शतक केलं आहे. शुभमन गिलनं कसोटी क्रिकेटमधील आठवं शतक केलं आहे. दुसऱ्या डावात शुभमन गिलनं केलं आहे. यामुळं भारत बर्मिंघम कसोटीत मजबूत स्थितीत पोहोचला आहे. पहिल्या डावात शिस्त दाखवली तर दुसऱ्या डावातील खेळीत शुभमन गिलनं आक्रमक फलंदाजी केली. त्यानं १२९ बॉलमध्ये शतक पूर्ण केलं.

शुभमन गिलनं पहिल्या डावात २६९ धावा केल्यानं संघानं ५८७ धावा केल्या होत्या. त्या डावात यशस्वी जयस्वालनं ८७ तर रवींद्र जडेजानं ८९ धावा केल्या होत्या. या जोरावर भारतानं ५८७ धावा केल्या होत्या. मोहम्मद सिराज आणि आकाश दीपनं दमदार गोलंदाजी करत इंग्लंडला ४०७ धावांवर रोखलं. मोहम्मद सिराजनं ६ विकेट तर आकाश दीपनं ४ विकेट घेतल्या. इंग्लंडकडून हॅरी ब्रुकनं १५८ आणि जेमी स्थिथनं नाबाद १८४ धावा केल्या. या दोघांच्या फलंदाजीच्या जोरावर इंग्लंडनं ४०७ धावा केल्या. सिराज आणि आकाशदीपच्या गोलंदाजीमुळं इंग्लंडचे सहा फलंदाज पहिल्या डावात खातं देखील उघडू शकले नाहीत.



# नीरज चोप्राने एनसी क्लासिक स्पर्धेत जिंकले सुवर्णपदक

**बेंगळुरू (प्रतिनिधी)–** शनिवारी बेंगळुरूमधील श्री कांतीरवा स्टेडियममध्ये आयोजित करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत यजमान म्हणून भाग घेणारा भारतीय खेळाडू नीरज चोप्राने पुन्हा एकदा शानदार कामगिरी करत, स्वतःला सिद्ध केले आहे. एनसी क्लासिकच्या पहिल्याच सत्रात नीरजने सुवर्णपदकावर आपला हक्क गाजवला.

सुवर्णपदकावर गवसणी घालणारा नीरजचा सर्वोत्तम भालाफेक हा तिसऱ्या प्रयत्नात होता. शनिवारी बेंगळुरूच्या कांतीरवा स्टेडियमवर झालेल्या या स्पर्धेत नीरज चोप्राने इतर ११ खेळाडूंना पराभूत करून ही कामगिरी केली आहे. सर्वोत्तम कामगिरी करताना नीरजने ८६.१८ मीटर अंतर गाठले. तर केनियाचा ज्युलियस येगो दुसऱ्या क्रमांकावर राहत रौप्यपदक मिळवले. येगोने ८४.५१ चा सर्वोत्तम फेक केला. त्याच वेळी, श्रीलंकेच्या रमेश पाथिरागे (८४.३४ मीटर) ने कांस्यपदक जिंकले. नीरज चोप्राची स्पर्धेत सुरुवात चांगली झाली नाही. त्याचा पहिला प्रयत्न फाऊल होता. त्यानंतर त्याने दुसऱ्या प्रयत्नात ८२.९९ मीटर अंतर गाठले. तिसऱ्या प्रयत्नाने तो अव्वल स्थानावर पोहोचला. तर त्याचा चौथा प्रयत्न फाऊल होता. नीरजचे शेवटचे दोन प्रयत्न अनुक्रमे ८४.०७ आणि ८५.७६ मीटर होते.

# शेतात आखाड्यावर झोपलेल्या शेतकऱ्याचा खून

## पत्नीच्या तक्रारीवरून हदगावमध्ये गुन्हा दाखल; आरोपी पोलीस कोठडीत

**नांदेड (प्रतिनिधी)–** हदगाव तालुक्यातील डोरली येथील रहिवासी कैलास विश्वनाथ काटेकर हा शेतकरी सायंकाळी शेतात आखाड्यावर झोपण्यासाठी गेला. परंतु सकाळी दररोजच्या वेळी परत न आल्यामुळे पत्नी दहा वाजता शेतात गेली असता तिला आपला पती मृतावस्थेत आढळून आला. याप्रकरणी मयताची पत्नी शितल ह्यांच्या फिर्यादीवरून हदगाव पोलीस ठाण्यात अज्ञात मारेकऱ्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. हदगाव पोलिसांनी दोन्ही मारेकऱ्यांना अटक केली असून त्यांना न्यायालयाने पोलीस कोठडीत पाठवले आहे.

हदगाव-तामसा महामार्गावर हदगांवपासून दक्षिणेस दहा किलोमीटर अंतरावर असलेल्या डोरली येथील अल्प भूधारक शेतकरी कैलास विश्वनाथ काटेकर यांची गावापासून अर्धा किलोमीटर अंतरावर बागायती शेती आहे. त्यांच्या शेतामध्ये सध्या हळद लागवड करण्यात आलेली असून पाण्यासाठी बोअरवेल आहे. याच शेतामध्ये राहण्यासाठी छोटेशे पत्राचे शेड म्हणजे आखाडा आहे. गावापासून थोडे दूर असल्यामुळे शेतात चहापाणी आणि एखाद्यावेळी गावाकडे नाही जाणे झाल्यास शेतातच जेवण बनवण्यासाठी व्यवस्था होईल असे खाद्यपदार्थ ठेवलेले असतात. शुक्रवारी सायंकाळी कैलास हा आपल्या शेतात शेताची राखण करत शेतातच मुक्काम करण्यासाठी गेला होता. घरून जेवण नेले नसल्यामुळे त्यांनी तिथेच वरण-भात बनवल्याचे सकाळी दिसून आले. सकाळी दररोजच्या वेळी कैलास घरी परतला नाही त्यामुळे कुटुंबीय दहा वाजता जेवण आणि जेवणाचा डबा वगैरे घेऊन शेतात गेले. आखाड्यावर गेले असता तिथे कैलास याचा रक्ताने माखलेला मृतदेह दिसून आला. कोणीतरी अज्ञातांनी त्याचा खून केल्याचे निदर्शनास आले. दृश्य पाहून घाबरलेल्या पत्नीने नातेवाईकांना फोन



करून सांगितले आणि हदगाव पोलीस ठाण्याला माहिती दिली. माहिती मिळताच हदगाव पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना पाठवून तेथील पंचनामा करून प्रेत उत्तरीय तपासणीसाठी हदगाव येथील उपजिल्हा रुग्णालयात आणले. शेतातील आखाड्याच्या संपूर्ण पत्र्याच्या खोलीत रक्त सांडलेले दिसून आले. या पत्र्याच्या खोलीची उंची अत्यंत कमी आहे. आणि त्या पत्र्याच्या खालील लाकडाला छताचा पंखा लावलेला आहे. पोलिसांनी या पंख्याची उंची आणि मयताच्या गळ्याची मार लागलेल्या ठिकाणाची लांबी मोजल्यावर ही समान असल्याचे दिसून आले. या पंख्याचे सर्व पाते रक्ताने माखलेले आणि सर्व पाते वाकलेले दिसत असल्याचे पोलिसांनी सांगितले. प्रथमदर्शनी हा अपघाती मृत्यू असल्याचे पोलिसांचे मत आहे. परंतु मयताच्या शरीरावर तीक्ष्ण हत्यारांच्या वाराचे छातीला आणि पोटाला छिद्र असल्याचे मयताच्या पत्नीने आणि मुलाने सांगितले. तसेच शेतामध्ये दोन किंवा तीन माणसांना पुरेल एवढे डाळ आणि भात शिजवलेली असली तरी फक्त एकच ताट जेवलेले खरकटे आढळून आले. मयत कैलास काटेकर याला दारू पिण्याच्या कारणावरून नारायण गंगाधर टोकलवाड आणि सुरेश शिरसाट दोघे रा. डोरली यांनी खून केला असल्याचा संशय आहे.

याप्रकरणी माहिती घेण्यासाठी आणि तपास यंत्रणेला मार्गदर्शन करण्याकरिता अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव हे लवाजम्यासह हदगावला दाखल झाले होते.

# ऐका पंढरीचे महिमा...!



भारतात महाराष्ट्र सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक चळवळीच्या दृष्टीने महत्वाचे राज्य! कन्याकुमारीपासून ते काश्मीर पर्यंत भारताच्या इतिहासाची साक्ष महाराष्ट्र सदैव देत असतो. महाराष्ट्राच्या विविधतेतून एकता या मूलमंत्रात अनेक महत्वाच्या बाबी आहेत. त्यात सर्वात महत्वाची महाराष्ट्राची ओळख म्हणजे आषाढी एकादशीची पंढरीची वारी! पंढरीची वारी आणि तिच्या संघर्षाचा इतिहास मोठा विस्मयकारी आहे. पंढरीची वारी समजून घेण्यासाठी वारकरी संप्रदाय आणि त्याची जनमानसात रुजवणूक करणाऱ्या संतांचा आणि त्यांच्या लढ्याचा इतिहास पहावा लागेल. पंढरीचा पांडुरंग, त्यापासून वेगळी उभी असलेली रखुमाई, त्यांचा आत्तापर्यंतचा प्रवास आणि त्यांना लोकांपर्यंत पोहोचवलेले अनेक संत.

साधारणतः संत नामदेवांच्या काळापासून म्हणजेच तेराव्या शतकापासून पंढरीच्या श्री विठ्ठलाचे महात्म्य महाराष्ट्राच्या सामान्य वारकऱ्यांना माहिती व्हायला लागले. त्यागोदरही हे दैवत होते आणि त्याची उपासना करणारी मंडळी होती, ती मात्र कमी प्रमाणात. याचे कारण आपल्याला सहजच पंढरीचे मूळ रहिवाशी असलेले महान कविवर्य मोरोपंत संत नामदेव चरित्र संदर्भाने लिहिलेल्या आर्या

श्री नारदमुनीचे जे समूहव्रत तेंचि नामदेवाचे।
याने प्रसिद्ध केले विठ्ठल हे भव्य नाम देवाचे।।

असे लिहून संत नामदेवांचे विठ्ठलनाम आणि भक्तीच्या आधारे चरित्र आणि त्यांचा अधिकार लोकाभिमुख करतात. विविध धर्मग्रंथात जसे नारदाचे महत्व वाचायला मिळते तसेच वारकरी संप्रदायात संतशिरोमणी नामदेवांचे महत्व आहे! वारकरी संप्रदाय हा हिंदू धर्मातील एक महत्वपूर्ण पंथ आहे. जैन, बौद्ध आणि महानुभाव धर्म विचारांनी भेद करणाऱ्या वेदांना सरळ नाकारून आपला नवा समतेचा विचार मांडला; तसेच पण थोड्या सौम्य पद्धतीने वारकरी संप्रदायाने वेदांना हळूच बगल देऊन आपला समतेचा विचार लोकमनात पेरण्याचे महत्वपूर्ण काम केले. त्यात नामदेवांनी सर्वसामान्य लोकांचा, काहीही न मागणारा, कोणताही भेद न करणारा, केवळ नाम, भजन, कीर्तनावर आपल्या भक्तांच्या मेळ्यात येऊन राहणारा, कोणत्याही कर्मकांड, अंगारा-धुपारा, नैवेद्य इत्यादी शिवाय लोकांत येऊन नाचणारा श्री विठ्ठल बहुश्रुत केला. त्याच ताकदीने आपल्याच सनातनी, कर्मकांडी विचारांच्या लोकांनी नाकारलेल्या, अभिजनातून आलेल्या ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी सारखा अनमोल ग्रंथ मराठीत लिहून वारकरी संप्रदायाला सप्रमाण वारकरी संप्रदाय म्हणून एक अधिष्ठान दिले. कोणताही नवा विचार किंवा धर्म स्थापन करायचा असेल तर त्यासाठी प्रमाणग्रंथ असायला हवा आणि वेदांताप्रमाणे दुय्यम असलेल्या श्रीमद्भगवद्गीतेचा मायबोली मराठीत मोठा रसाळ, भावपूर्ण अनुवाद करून ज्ञानदेवांनी बहुजनांना अलौकिक ज्ञानाचा अमृतकुंभ खुला केला. ज्ञानेश्वरीत ज्ञानदेवांनी वेद आणि वेदांच्या तत्वज्ञानाला उघडे पाडतांना

वेदु संपन्नु होय ठाईं।
परी कृपणु ऐसा आनु नाहीं।
जे कानीं लागला तिहीं।
वर्णांच्याचि ।। १४५७ ।।

असे लिहून वेद आणि वेदांच्या मर्यादांना उजागर केले. ज्ञानदेवांचे हे फार मोठे बंड होते, हे नाकारून चालणार नाही. याचा त्यांना अगदी शेवटच्या श्वासापर्यंत त्रास झाला असावा यात तिळमात्र शंका नाही. हाच क्रांतीचा वसा पुढे संत एकनाथांनी उभारोनी बाह्या सकळा अश्वासन। यारे अठरा वर्ण पंढरीसी ।।

अशा सडेतोड ओळी लिहून आणि पुढे तुकोबांनी भेदाभेद भ्रम अमंगळ असून वेदांचा तो अर्थ आम्हासीच। ठावा येरांनी वहावा भार माथा लिहून सर्वच वेदांचा डांगोरा पिटून स्वतःचे श्रेष्ठत्व सिद्ध करणाऱ्यांना चपराक दिली.

पंढरीचा आणि पंढरीच्या वारीचा हा इतिहास पाहतांना पंढरपूर आणि पंढरपुरचे वाळवंट हे आद्य क्रांतीचे ठिकाण! पंढरीची वारी म्हणजे प्रत्येक एकादशीला पंढरपूरला नाचत जाऊ त्याच्या गावा नाचत, भजन करत आनंदाने जाणे, चंद्रभागेत स्नान करणे, वाळवंटात कीर्तन ऐकणे आणि घरी येणे. त्यातील आषाढी हा सर्वात मोठा सोहळा! आषाढ वारीची ही परंपरा संत नामदेव-ज्ञानदेवांच्या अगोदरपासून महाराष्ट्रात सुरु होती याचे अनेक दाखले विविध ग्रंथात आढळतात. एवढेच झाले की; संत नामदेवांनी आपल्यानंतर येणाऱ्या पिढीला पंढरपूरचे श्री विठ्ठल मंदिर वाळवंटाच्या रूपाने खुले करून दिले. संत नामदेवांच्या समकालीन अठरापगड जातीतील संतांना विठ्ठल मंदिरात प्रवेश निषिद्ध होता. नामदेवांनी बडव्यांशी संघर्ष करून मंदिर प्रवेश मिळवला मात्र सावतोबा, गोरोबा, चोखोबा, बंका, सोयरा, निर्मळा, जना, कान्होपात्रा, सेना, नरहरी आदि संतांना मंदिर प्रवेश बंदी होती. संत नामदेव फार हुशार संत होते. त्यांना ज्ञानदेवादी संत प्रभावळीचे भक्कम पाठबळ होते. यावर नामदेवांनी उत्तम उपाय शोधून काढला आणि तो उपाय म्हणजे वाळवंटात भजन, कीर्तन करणे आणि पुंडलिकाचे दर्शन घेणे! याचा परिणाम असा झाला की; श्री विठ्ठल मंदिरात न जाता विठ्ठल भक्त पंढरपूरच्या वाळवंटात भजन-कीर्तनाला थांबू लागले. तिथेच राहू लागले, परिणामी मंदिर प्रवेशाचा संघर्ष बाजूला राहिला आणि भजन-कीर्तन आदि सगुण नामभक्ती प्रकर्षाने पुढे आली. याचा परिणाम असा झाला की; बहुजन असलेले वारकरी भजन, कीर्तन करायला उभे राहिले. त्यात विशेषतः ज्ञानदेवांनी आपली प्रतिभा सिद्ध करून हरिपाठ, ज्ञानेश्वरी सारखे अनमोल ग्रंथ वारकरी संप्रदायाला दिले.

पंढरपूरच्या वाळवंटातील समग्र क्रांतीचा परिपाक असा झाला की; संत चोखोबाराय, संत सावतोबा महाराज, जनाबाई, सोयराबाई, कान्होपात्रा आदि संत भजन-कीर्तन करून अभंग लिहायला लागले. ते लिहित असतांना आपल्या मनातील खोल असणाऱ्या व्यथा वेदना मांडतांना चोखोबाराय

अबीर गुलाल उधळीत रंग।
अनाथा घरी नाचे माझा सखा पांडुरंग।।धृ।।
उंबरठ्यासी कैसे शिवू आम्ही जातिहीन।
रूप तुझे कैसे पाहू त्यात आम्ही दीन।
पायरीशी होवू दंग। गाऊनी अंभग।।१।।
वाळवंटी गावू आम्ही वाळवंटी नाचू।
चंद्रभागेच्या पाण्याने अंग अंग न्हाऊ।
विठ्ठलाचे नाम घेऊ। होवुनी नि:संग।।२।।
आषाढी कार्तिकी भक्तजन येती।
पंढरीच्या वाळवंटी संत गोळा होती।
चोखा म्हणे नाम घेता। भक्त होती दंग।।३।।

असा मोलाचा, मूळ विचार प्रकट करणारा अभंग लिहून जातात.

देवशयनी आषाढी एकादशी म्हणजे वारकरी मंडळींचा सर्वोच्च उत्सव! आजच्या दिवशी पंढरीत ऐका पंढरीचे महिमान। राउळ तितुके प्रमाण। तेथील तृण आणी पाषाण। तेहि देव जाणावे।। अशी अवस्था असते. लाखो वारकरी चंद्रभागेत अंघोळ करून श्री विठ्ठलमंदिराला प्रदक्षिणा घालतात, कळसाचे दर्शन घेतात आणि वर्षभरासाठी उर्जेचा संचय करून परततात. अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात पंढरीच्या वारीच्या निमित्ताने जात, धर्म, लिंग इत्यादी अनुषंगाने सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्यात आपण यशस्वी ठरलो आहोत. आज सर्वत्र जात-धर्माचे तीक्ष्ण अभिनिवेश बाहेर निघत असतांना पंढरीची वारी सामाजिक सलोखा टिकवण्यासाठी सातत्याने काम करते आहे. आजही भजन-कीर्तनात यारे यारे लहान थोर अभंग किंवा वर्ण अभिमानी कोण झाले पावन अशा ओव्यांच्या आधारे समता, मानवता जपण्याचे काम वारकरी संप्रदाय करत आहे. त्यासाठी आज खऱ्या अर्थाने वारकरी विचारांची समाजाला नितांत गरज आहे. आज सैराट तरुणाई धोक्याचे लक्षण आहे. माणसांमाणसांतील माणूसपण अखंड टिकवून ठेवायचे असेल तर एकदम टोकदार भूमिका, विचार थांबवून सर्वसमावेशक, एकतेचे, विश्वबंधुत्वाचे विचार मनामनात रुजवणे काळाची गरज आहे. असे होणे म्हणजे खऱ्या अर्थाने पंढरीची वारी सफल होणे होय! रामकृष्णहरी!

**-प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये**

कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ
जि. परभणी (महाराष्ट्र)
मो. ९१५८०६४०६८

# शंभराची नोट...

**वऱ्हाडी कथा**



बाबा, बा, फादर, नाना, अन्ना, बापूस, बुडा अश्या बऱ्याच नावानं ओयखला जाते थो असते बाप. ऊल्स लागलं, ऊल्स घसाटलं त आपल्या तोंडातूनं सहज ऊद्‌गार निंघतात माय व, मा व पन् जर मोठं मरनाचं संकट आल त अरे बापरे बाप! मंग वाघ दिसो, साप दिसो तव्हा मातर बापाची याद येते. ऊल्शा संकटासाठी माय त मोठ्या संकटासाठी बाप याद येते.

बापाचं फाटक टुटक खेटर जरी दारात पळ्ळ असलं तरी कोनाची बिशाद होतं नाह्यी थ्या घराकळे काया नजरेनं पाहाची. बाप हा पृथईवरचा साक्षात कामधेनू गाय असते. एक कंदीलातला जिन असते. पोरानं तोंडातूनं शबूद काळ्ळा थे वस्तू हातात येते. सोता तुटकी चप्पल दा वेळा सिवून घालनं पन् पोराले पोरीले बॅन्डेड जोळा चप्पलच घेते. सोता कपळ्याचे तीन जोळ साल दोन साल फाटेलोग घालनं पन् लेकराले बॅन्डेड कपळेचं घेयेनं. कवा राती थ्याच्या सातरीवर जावूनं पा फाटकी भोक पळलेली बनीयान अन् चड्डी नेसलेला बाप चिंध्या चिंध्या होयेलोग घालते. पन् थे सारं काही लपोते. वदरून सदरा अन् पॅन्ट खाली काय हाय थे फकस्त बापाले अन् कपळे धुनाऱ्या मायलेच ठावूक असते. खोबऱ्याचं तेल मयनाभर पुरलं पाह्यजेनं म्हनूनसन्या ऊल्स लावते.

कवा बापाचा हात हातात घेवून पा. हातावरच्या रेघा पुसल्या गेल्या असतीन मेहनतीनं. हातावर घट्टे अन् बोटाच्या आखरीच्या भागाले झिंग्गूळ्ळे दिसतीनं. ॲटो रिक्षा थो करत नाही. पायाच्या नसा फुगल्या असनं चालूनं चालूनं. पन् पोरं अथून तिथ अरधा किलोमीटर जा च असलं तरी तेयले रिक्षा, ॲटो पाह्यजे. थ्याच्या किलकिल्या डोयात पा पोरा पोरीसाठी अपार सपनं दळवूनं ठेवलेले असनं. पोरग जवान हाय खुराक दमदार हाय म्हनूनसन्या दवळीले पाहून पाहूनं लवू लवू जेवनारा बाप ओयखला गेला पाह्यजे. पोरगा पोटभर जेवला पाह्यजेनं म्हनूनसन्या अर्धपोटी निझनारा बाप ओयखला काय हो कोनी...

अशीचं एक कायनी घेवूनं येतो विदर्भातील एका खेळेगावातली . आकोला शहराले लागूनं असलेलं दहिगाव या गावात राह्ये किसनराव थ्याले एक पोरग अन् एक पोरगी होती. अकोला शेहरात जावूनं थो एका व्यापा-याकळे काम करे. घरी ना वावर ना धुरा.

किसन अर्ध्यारातीला ऊठला. बायको शांताले दबक्या अवाजात बोल्ला. शांता ऽऽऽ दवळीत भाकर हाय काय व ऊरली. हाव हाय पन....

बाल्याले पायटीच कालेजले जा च हाय त न्याहारी करनं पोरगं.

बरं!

किसन शांताले बरं म्हनूनसन्या पोट दाबत निझला. पन् बाजिंद्या भुकीनं किसनले रातभर निझू देल्ल नोत. ओ ऽऽ बाबू ऊठन बापा पायट झाली न. कालेजात जा च नाह्यी काय पाह्य कसा तिरप पळ्ळा. शांतान बाल्याले सळा शिपता शिपता आंगनातूनं अवाज लगावला. बाल्या ऊठला. न्हानीत जावूनं खापरीनं आंग घासूनं निंघाला. बापानं तांब्यानं पेरेस केलेले कपळे घातले. मा न्याहारीले वाहाळ. शांतान रातची अर्धी भाकर अन सोल्याची भाजी तासकीत वाहाळूनं आनली.

बाल्या बोल्ला...काय लावले रोजचेच तितंबे. सोल्याची भाजी अन् शिई भाकर. काह्यी येगळा परकार येत नाह्यी काय माय तुले. बाल्या ताट लोटत फनकारत रागारागानं बोल्ला. पोराचे बोल आयकूनं किसनले खराब वाटलं. आपन लेकराले साजर खा ले ही देवू शकत नाह्यी म्हनूनसन्या.

बरं बाबू ऊद्या इतवार हायनं ऊद्या खारं आनतो. सोल्याची भाजी आवळत नसन त दुद भाकर खाय. शियी भाकर अन् मोवागी सायीचं दुद मस्त लागते हिवायाचं.

किसन बाल्याले बोल्ला. काहाचं दुद अन् काहाची भाकरं. जरा दुनिया फिरा. काय चालू हाय त. पोरं धळालं पिझ्झा, बर्गर, केएफसी चिकनं, चायनीज राईस, चायनीज भेळ, चायनीज शेजवान मंचूरियन खातात अन् तुम्ही मले खावू घाला हे गवत. बाल्याचं भयतालं बोलनं आयकूनं शांताचं डोक्स भनकलं.

भाकर, दुद, सोल्याची भाजी, कयन्याकोंड्याची भाकर, वळ्या, तुरीची वरनं हे गवत अन् थे पिसा भरगर तुले अमरीत हायं नाह्यी काय?

किसन मंधात बोल्ला...मुकी बस शांता. आजकालच्या पिढीले जे आवळनं थेच खायनं ना. शांता भळकत फनकार्यान बोल्ली...मंग गोदरीतला गू खाय म्हना. बाल्या न्याहारी न करता तसाच बॅग ऊचलूनं फाट्यावर एसटी धराले गेला. किसनच्या मनात कालवाकालव सुरू झाली. पोरगं ऊपाशी गेलं. दोन भाकरी अन् रायत घेवूनं थोड्या टायमानं किसनही आकोल्याले निंघाला. किसनाचं मन किसनालेचं खाये. लेक आपला पगार लै कमी पळते काह्यी तरी डबल काम करा लागनं. लेकराच्या गरजा भागवा लागनं. पुळचं शिक्शन त अधिकचं खर्चाचं हायं. पोराले शंभरक रूपये देवू ह्या ईचारानं किसन शिवाजी महाविद्यालयाच्या गेटाजौळ गेला. अवघ कॉलेज डोयानं पाह्यलं. गेटातूनं अंदरे गेला. माजी प्राचार्य लोककवी डॉ. विठ्ठल वाघ ययनं कालेज मेहनत करूनं साजर सजोलं होतं. दोन तीनं पोरं घोयक्यानं ऊभे होते. तथिसा जावून किसनराव एका पोराले म्हनले.

बी. ए. फस्ट ईअरचा वर्ग कुठ्सा हाय बाबू. पोरानं बोट दाखवत सांगल. मामा तथून पाय-या चळा. पयल्या मजल्यावरची दुसरी खोली बिए फस्ट ईअरचा वर्ग हाय. किसन पोराच्या ओढीनं धावतच हासत पाय-या चळ्ळा. वर्गात डुकून पाह्यल. पैकीने नावाचे मास्तर मराठी लिटरेचर शिकोत होते. सरांनी बाहेर पाहिलं. अन् किसनची ईचार पूस केली. कोण आपण.

मी किसनराव ईसळ. बाळासाहेब ईसळचा वडील. किसन बोल्ला. पैकीने सरांनी बाल्याले हाका मारत म्हतलं.

बाळासाहेब तुझे बाबा आले.

किसन नाक फुगवत अन् पाय आपटत फनकार्यान बाहेर आला. बापाले बोलू न देताच बाल्या बोलाले लागला.

तुम्ही अथिसा काहाले आले पयले मले सांगा. मयकटलेले कपळे घालूनं चाल्ले मोठे मले भेटाले. वरगातले पोर पोरी काय म्हनतीनं... असा मयकटलेला तुटक्या चपलीतला तुवा बाप. हासतीनं सारे पोरं पोरी मले. अन् अंदर डुकून पाहाची गरज काय. हे शेहर हाय. अथिसा साजऱ्या कपळ्यातल्या अन् सुटाबुटातल्या लोकायचे आदर किंमत इज्जत हाय. किसन एखांद्या बुजगावन्यावानी थक्क ऊबा होता. पोराच्या बोलन्यानं थटथट कायीज टुटत होतं. ति ति थो टुटत होता. कायजात चमका ऊठत होत्या. कायीज थळथळत होतं. पोटऱ्यात गोये आले होते. डोये खुल्लेच्या खुल्ले होते. आसवायले डोयानं बांध घातला होता. बाल्या डबलूनं बापाले बोलाले लागला...

खबरदार जर डबलूनं अथिसा पाय ठिवला त. मले अस तुम्च वागनं बिलकूल पटलं नाह्यी. निंघूनं जा आताच्या आता.


किसननं हातात आनलेली शंभरी चुरगायली. पाय-या ऊतरत ऊतरत थ्याच्या हातातूनं कवा पळ्ळी थ्याले कयली नाह्यी. थो गेटाबाहेरी आला. पलटून न पाह्यता कामावर गेला. दोन पिरेड नंतर ऑफ होता. पोरं बाहेरी निंघाले. बाल्याले पाय-या ऊतरता शंभरची नोट सापळ्ळी. थो लय हरिकला. दोस्ताले पानीपुरी भेळ थ्यानं खावू घातली. संध्याकायी हासत घरी आला. मायबाप दोघही शंभरी डब्याडुब्यायनं, पांघरूनात शोधत हुसकत होते. पन् पोराले थ्याचं काहीच घेनं देनं नोतं.

**- सु. पुं. अढाऊकर.**

अकोला.
मो. ९७६९२०२५९७

# योग प्रचारक : राम शिवपनोर

दीर्घ शासकीय सेवेनंतर सेवानिवृतीनंतरचा काळ आपल्या परिवारासह घालविण्याचा बऱ्याच जणांचा प्रयत्न असतो. पण यास काही मोजकेच लोक सेवा निवृत्ती नंतरही समाजासाठी, समाजाच्या भल्यासाठी आपले आयुष्य समर्पित करतात. समाजासाठी सेवानिवृत्ती नंतरचे आयुष्य समर्पीत करणाऱ्या मोजक्याच व्यक्तींपैकी एक म्हणजे बिलोली तालुक्यातील बोळेगाव येथील सेवानिवृत्त कर्मचारी राम बळीराम शिवपनोर यांचे नाव घ्यावे लागेल.



३४ वर्षाची दीर्घ शासकीय सेवा पूर्ण करून सेवानिवृत झालेल्या राम शिवपनोर यांनी सेवा निवृत्ती नंतरचे आयुष्य आपल्या कुटुंबासाठी न देता गेल्या १४ वर्षापासून योगाच्या प्रचार व प्रसारासाठी आपले आयुष्य खपवीत आहेत.शिवपनोर यांना तरूण पणापासूनच योगाची आवड असल्याने त्यांनी शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त होताच पंतजली योगपीठ हरिद्वार येथून योग प्रशिक्षण पुर्ण केले.त्यानंतर योग शिक्षक,योग विस्तारक,भारत स्वाभिमान न्यास सह प्रभारी अशा विविध पदांवर काम केले आहे.शिवपनोर यांच्या कार्याची दखल घेऊन आक्टोंबर २०२१ मध्ये हरिद्वार येथुन त्याच्यावर भारत स्वाभीमान न्यास च्या नांदेड जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली.मिळालेल्या जबाबदारीला न्याय देत गेल्या १४ वर्षापासून राम शिवपनोर यांनी नांदेड जिल्ह्यातील १६ ही तालुक्यात आज पर्यंत जवळपास १५० निशुल्क योग शिबीरे घेतली.या शिबीरांच्या माध्यमातून तब्बल ५०० च्या वर सहयोग शिक्षकांना प्रशिक्षण देण्याचे काम शिवपनोर यांनी केले आहे.

शिवपनोर यांच्या अविश्रांत योग प्रसार व प्रचाराच्या कार्यामुळे नांदेड जिल्ह्यात आज घडीला २०० योग वर्ग चालू आहेत.योग प्रशिक्षणाचे कार्य करीत असतानाच नांदेड जिल्ह्यात योगा विषयी बैठका घेणे,पतंजली योग पिठ हरिद्वार ने निर्देशीत केलेल्या सर्व उत्सव साजरे करण्यासाठी शिवपनोर हे अविरत प्रवास करीत आहेत.

योगाच्या माध्यमातून आहार, निद्रा व दिनचर्येत बदल करून मधुमेह, उच्चरक्तदाब,हृदय विकार,उदर विकार ,बुद्धकोष्टता,पाठदुखी,कंबरदुखी,आशा विविध आजारांना मानसाच्या आयुष्यातुन सेवानिवृत्त करण्यासाठी गेल्या १४ वर्षापासून प्रयत्न करणारे योग शिक्षक राम बळीराम शिवपनोर यांच्या कार्याची दखल घेऊन मुख्य केंद्रीय प्रभारी यांनी गौरव केला आहे तर महाराष्ट्र शासनातर्फे प्रशस्ती पत्र,पतंजली योग पिठ हरीद्वार तर्फे प्रशस्तीपत्र,माजी खासदार तथा आमदार प्रताप पा.चिखलीकर यांनी योग शिक्षक म्हणून सन्मान केलेला आहे.काही दिवसांपुर्वी गंगामाता शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने योग शिक्षक राम बळीराम शिवपनोर यांना बिलोली तालुका भुषण पुरस्कार घोषित करण्यात आले असून त्या बद्दल राम शिवपनोर यांचे हार्दीक अभिनंदन आणि यापुढेही राम शिवपनोर यांच्या हातून योग प्रशिक्षणाचे कार्य घडत राहो हिच सदिच्छा..!

**-सौ. ललिता बंडे मुंडकर**

बिलोली

# श्री चरणी : नवयुवतींसाठी प्रेरणादायी झंझावाती खेळाडू

भारतीय महिला क्रिकेट संघाच्या यशगाथेत अलीकडेच एक नवे तेजस्वी पान जोडले गेले आहेते म्हणजे श्री चरणी या नवोदित खेळाडूचे. वयाच्या अवघ्या २० व्या वर्षी भारताच्या जर्सीत मैदानात उतरून तिने आपली प्रतिभा आणि ताकद दाखवून दिली आहे. तिच्या गोलंदाजीच्या प्रहाराने केवळ इंग्लंडच्या फलंदाजांनाच नव्हे, तर समस्त क्रीडाजगतालाही आश्चर्यचकित केले.



२८ जून २०२५ रोजी इंग्लंडविरुद्ध खेळल्या गेलेल्या टी-२० मालिकेतील पहिल्याच सामन्यात, स्मृती मंधानाच्या नेतृत्वाखाली भारतीय महिला संघाने ९७ धावांनी भव्य विजय मिळवला. या विजयामागची एक प्रमुख शिल्पकार म्हणजे श्री चरणी, जिने आपल्या पदार्पणातच ४ बळी घेत मैदानात खळबळ माजवली. तिच्या फिरकीच्या जाळ्यात इंग्लंडच्या फलंदाजांना अडकवून तिने भारताला मोठा विजय मिळवून दिला. ही केवळ तिच्या क्रिकेट कारकिर्दीची सुरुवात होती, पण तिच्या खेळात असलेल्या आत्मविश्वासामुळे ती भविष्यातील स्टार ठरणार, हे स्पष्ट दिसत होते.

आंध्र प्रदेशातील वाय.ए.आर.कडप्पा जिल्ह्यातील एका छोट्याशा खेडेगावात, एमिल्ले नावाच्या गावात ४ ऑगस्ट २००४ रोजी श्री चरणीचा जन्म झाला. तिचे वडील चंद्रशेखर रेड्डी हे रायलसीमा थर्मल पॉवर प्रकल्पात एक सामान्य कर्मचारी म्हणून काम करत होते. खेडेगावातील मुलगी, मर्यादित साधनसंपत्ती, पण स्वप्ने मात्र आभाळाएवढी ही श्री चरणीची ओळख ठरली.

लहानपणी तिला बॅडमिंटन आणि खो-खो यासारख्या खेळांमध्ये रुची होती. पण जेव्हा तिने स्मृती मंधाना आणि युवराज सिंगसारख्या खेळाडूंच्या कामगिरीकडे पाहिले, तेव्हा तिच्या मनात क्रिकेटची ज्वाला पेटली. तिच्या काकांनी किशोरकुमार रेड्डी यांनी तिच्यातील क्षमतेची ओळख पटवली आणि तिला प्रशिक्षण द्यायला सुरुवात केली. कठोर परिश्रम, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या बळावर तिने अंडर-१९ भारतीय संघात स्थान मिळवले.

डावखुरी फलंदाजी आणि डावखुरी फिरकी गोलंदाजी ही तिची खासियत ठरली. 'महिला प्रीमियर लीग २०२५' मध्ये दिल्ली कॅपिटल्स संघाने तिच्यावर ५५ लाख रुपयांची बोली लावत तिला आपल्या संघात सामील करून घेतले. तिच्या पदार्पणाच्या सामन्यातच आरसीबीविरुद्ध तिने एका षटकात दोन बळी घेतले आणि चाहत्यांना थक्क केले. फायनल सामन्यात मुंबईविरुद्ध देखील तिने दोन विकेट्स घेत आपल्या कामगिरीत सातत्य दाखवले. 'ए' श्रेणी क्रिकेट स्पर्धेत तिने 'इंडिया बी' संघाविरुद्ध ५ बळी घेतले आणि एकूण तीन सामन्यांमध्ये ९ विकेट्स मिळवून दिल्या.

एप्रिल २०२५ मध्ये श्रीलंका आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्ध झालेल्या एकदिवसीय त्रिकोणी मालिकेसाठी तिची भारतीय वरिष्ठ संघात निवड झाली. २७ एप्रिल रोजी श्रीलंकेविरुद्ध पहिला वनडे सामना खेळताना तिने ६ बळी घेतले आणि आपली दर्जेदार कामगिरी सिद्ध केली.

श्री चरणी केवळ एक क्रिकेटपटू नाही, तर ती नव्या भारतातील युवतींची प्रेरणास्रोत आहे. छोट्याशा खेडेगावातून निघून आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव कमावणारी ही मुलगी प्रत्येक ग्रामीण भागातील मुलीला हे शिकवते की जर जिद्द असेल, तर यश दूर नाही!

तिचा हा प्रवास प्रत्येक तरुणीला स्वप्न बघण्याची आणि त्यासाठी लढण्याची उमेद देतो. भविष्यात ती भारतासाठी विश्वचषक जिंकवेल, अशी अपेक्षा देशवासीय करत आहेत. कारण श्री चरणी ही केवळ एक नाव नाही, तर भारताच्या क्रिकेटमधील नवे स्वप्न आहे!

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**

जत जि.सांगली



## सखा पांडुरंग..

पाऊले चालती पंढरीची वाट
पाऊले चालती पंढरीची वाट,
मुखी विठ्ठल-विठ्ठल गजर सतत.
टाळ-मृदुंगाच्या नाद लहरी,
हरिपाठात रंगली अवघी वारी.
भेदभाव विसरुनी सारे,
संतांच्या वाटेवर चालती लेकरे
उन्हा-पावसात एकच आस,
विठुरायाच्या भेटीचा प्रकाश.
आळंदी देहू येती चंद्रभागा तीरा,
माउलीच्या कृपेचा पाझरतो झरा.
पावल्यांच्या ठशात श्रद्धा भरली,
भक्तिभावात वारी सारी रंगली.
वारी जपते संस्कार नवे,
संतांचे विचार उरात सवे.
पंढरीच्या वारीची पावन गाथा,
तव कृपेने सफल जीवन गाथा

**- प्रा. व्ही. व्ही. कोष्टी,**

शिपूर (जि. सांगली)

## थोडक्यात...

### भोकर तालुक्यातील बोरगावातून बॅग लिफ्टिंग

**नांदेड (प्रतिनिधी)**– लघुशंकेसाठी थांबलेल्या एका व्यक्तीच्या दुचाकीवरील आठ हजार रुपये किमतीची बॅग अज्ञात चोरट्याने लंपास केली. ही घटना एक जुलै रोजी रात्री साडेआठच्या सुमारास घडली. भोकर तालुक्यातील जामदरी तांडा येथील सत्यम गणेश जाधव (वय १९) हा बोरगाव ते भोकर फाटा दरम्यान चैतन्य इंडिया पिन क्रेडिट प्रायव्हेट लिमिटेड कंपनीची वसुली करून एक जुलै रोजी रात्री साडेआठच्या सुमारास येत होता. त्याची दुचाकी बोरगाव शिवारात येताच त्याने लघुशंकेसाठी दुचाकी थांबवून बाजूला गेला. यावेळी चोरट्यांनी आठ हजार चारशे नव्वद रुपये रोख रक्कम व पावतीबुक आणि इतर कागदपत्रासह असलेली बॅग लंपास केली. सत्यम जाधव याच्या फिर्यादीवरून भोकर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार कळणे करत आहेत.

### ३० हजार रुपयांचा गुटखा जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड शहराच्या तेहरानगर भागातून अमेरखान बशीरखान पठाण (वय ३२) रा. तेहरानगर याने घरात तीस हजार रुपयांचा गुटखा साठवून ठेवला होता. ही माहिती मिळताच शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी त्या ठिकाणी कारवाई केली आणि विविध कंपनीचा गुटखा, पानमसाला, सुगंधित जाफरानी तंबाखू असा ३० हजार १७७ रुपयांचा माल जप्त केला. अंमलदार दत्ता वडजे यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात अमेरखान पठाणविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक कदम करत आहेत.

# अभ्यासात सातत्य ठेवल्यास यश निश्चित –आ.चिखलीकर



**नांदेड (प्रतिनिधी)**– कोणत्याही परीक्षेत सात्यत्यपूर्ण मेहनत आवश्यक आहे. त्यासाठी विद्यार्थी व युवकांनी अभ्यासात सातत्य ठेवून अभ्यास करावा. त्यांच्यापदरी यश हमखासद मिळणार आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले.

पक्षाचे प्रदेश सरचिटणीस वसंत सुगावे पाटील यांच्या वतीने आयोजित केलेल्या घुंगराळा येथील गुणवंत विद्यार्थी व शासकीय सेवेत निवड झालेल्या कर्मचाऱ्यांच्या सत्कार सोहळ्याते ते बोलत होते.

घुंगराळा येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशसरचिटणीस वसंत सुगावे पाटील यांनी गुणवंत विद्यार्थी व शासकीय सेवेत निवड झालेल्या कर्मचाऱ्यांच्या सत्कार सोहळा कार्यक्रम आयोजित केला होता.

गुणवंताचा सत्कार आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जि. प. माजी सभापती शिवराज पाटील होटाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून दिलीपराव धर्माधिकारी, बालाजीराव शिंदे, अशोक पाटील मुगावकर, प्रा. सुनील नानवटे, किशोर नावंदे, सहायक पोलीस निरीक्षक विशाल भोसले, प्रभारी गट विकास अधिकारी संजय मिरजकर, सचिन नाईक, विश्वनाथ बडूरे, सरपंच सौ. रुक्मिणीबाई पांचाळ आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या व शासकीय सेवेत निवड झालेल्या ७० गुणवंताचा आ. चिखलीकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमानंतर राजेश मोरे देगावकर यांनी आमदार चिखलीकर यांच्याहस्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

यावेळी राष्ट्रवादी दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी बरबडेकर यांनी मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, वसंत सुगावे यांच्या प्रतिवर्षी होणाऱ्या सामाजिक, धार्मिक, उपक्रम व विकास कामांची तोंड भरून स्तुती करत अशा धडपड्या व्यक्तीला गावापुरते मर्यादित न ठेवता जिल्हा परिषद बरबडा गटाची उमेदवारी देण्याची गरज आहे, असे जाहीर करतातच उपस्थितांमधून टाळ्यांचा कडकडाट झाला. एकाच बरबडा गटात धर्माधिकारी व सुगावे हे येत असल्याने आपसात प्रकरण निपटून घेतल्याबद्दल कौतुक करीत चिखलीकरांनी सुंठे वाचून खोकला गेला, अशी प्रतिक्रिया देत वसंतरावांचे तोंडभर कौतुक करून दिलीप धर्माधिकाऱ्याच्या औदार्याचे धर्माधिकारी नावाला शोभेल असे कार्य दाखविल्याचे स्पष्टपणे जाहीर केले.

धर्माधिकारी यांनी बरबडा जि. प. साठी सुगावेंचे नाव सुचवल्याने सुगावेची वाट मोकळी झाल्याचे आमदार चिखलीकर यांनी जाहीर केले. प्रा. माधव यमलवाड यांनी सूत्रसंचालन केले. परबता हणमंते गुरुजी यांनी आभार मानले. या कार्यक्रमास सावरखेड, रुई, निळेगव्हाण, आंतरगाव, कृष्णर, वंजारवाडी या गावांसह अनेक गावांचे सरपंच, चेअरमन, विद्यार्थी, पालक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण करणे काळाची गरज –भाजप जिल्हाध्यक्ष अ‍ॅड.किशोर देशमुख



**अर्धापूर (प्रतिनिधी)** – निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण करणे गरजेचे आहे. तसेच 'बिना सहकारी, नही उध्दार' या ब्रिद वाक्याप्रमाणे सहकारी संस्थांना जपले तरच या संस्था वेळोवेळी आपल्याला कर्ज पुरवठा करतात, असे मत जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. किशोर देशमुख यांनी केले आहे.

राष्ट्रीय सहकार वर्ष स्थापना दिनानिमित्त येथील सहाय्यक निबंधक कार्यालयात लाभ लक्ष्मी महिला बिगर शेती सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण व महिला बचत गटांना कर्ज वाटपाचा कार्यक्रम पार पडला. त्यावेळी अ‍ॅड. देशमुख बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लाभ लक्ष्मी महिला संस्थेच्या अध्यक्षा सौ. मीनाक्षीताई देशमुख, प्रमुख मार्गदर्शक म्हणून भाजप उत्तर जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. किशोर देशमुख, सहाय्यक उपनिबंधक सौ. अरुणाताई केंद्रे, सहकार अधिकारी सौ. वैशालीताई गोरे,सहकार अधिकारी पी. एल. देशपांडे, सचिव सखाराम पवार, सचिव नारायण वाघमारे, सचिव रेवणसिद्ध पडोळे, महिला समुपदेशन केंद्राचा स्मिता तरटे, भाजप महिला मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्षा सौ. वर्षाताई बंडाळे, सौ.संगिता मिटकरी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी लाभ लक्ष्मी महिला संस्थेच्या वतीने उपस्थित मान्यवरांच्या सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलतांना सहाय्यक उपनिबंधक सौ. अरूणाताई केंद्रे म्हणाल्या की, सहकारी संस्था विभागाच्या वतीने वृक्षारोपण व संस्थाचे ऑडिट व संस्थेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन संस्थांना मार्गदर्शन करणे तसेच महिला कर्ज वाटप करुन महिला सक्षमीकरण करून महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी संस्थानी पुढाकार घ्यावा असे आवाहन सौ.केंद्रे यांनी केले आहे.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लाभ लक्ष्मी संस्थेचे शाखा व्यवस्थापक परमेश्वर लालमे, नारायण बंडाळे, गजानन वाघ, देविदास देवडे, संजय डूबे, बालाजी कानोडे, संदिप बंडाळे, गजानन गवळी, गणेश श्रीमंगले आदीसह महिला बचत गटाच्या चंद्रकला घुले, प्रगती लालमे, स्वाती देवडे, व्दारकाबाई श्रीमंले आदींनी परिश्रम घेतले.

# मुक्त विद्यापीठाचे नांदेड विभागीय केंद्र राज्यात अव्वल



**नांदेड (प्रतिनिधी)** – यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे नांदेड विभागीय केंद्र २०२४ –२५ या शैक्षणिक वर्षात विविध अभ्यासक्रमांसाठी एकूण ८४ हजार विद्यार्थ्यांचे प्रवेश नोंदणी केली होती. विशेष म्हणजे ही प्रवेश नोंदणी संपूर्ण महाराष्ट्रातून सर्वाधिक ठरली आहे.

नांदेड विभागीय केंद्राचे वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार डॉ. यशवंत कलेपवार यांचा सन्मान कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, भारतीय अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ.अनिल वाकोडकर, प्र– कुलगुरू डॉ. बिसेन आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा ३६ व्या वर्धापन दिनानिमित्त मुक्त विद्यापीठाच्या वतीने जीवन गौरव पुरस्कार, उत्कृष्ट शिक्षक,कर्मचारी आणि सर्वाधिक प्रवेश नोंदणी करणाऱ्या विभागीय केंद्राचा गौरव या कार्यक्रमात करण्यात आला. त्यात नांदेड विभागीय केंद्रास सर्वाधिक प्रवेश नोंदणी केल्याबद्दल विशेष पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमाच्या पार पडलेल्या उन्हाळी परीक्षेच्या जवळपास एक लाख उत्तरपुस्तिकाचे ऑनलाईन मूल्यांकन वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार प्रो. डॉ. यशवंत कलेपवार यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड विभागीय केंद्राने पूर्ण केले आहे. पुरवणी परीक्षेचे ही एकूण ४५००० हजार उत्तर पुस्तिकाचे ऑनलाईन मूल्यांकन झाले होते.

# सैनिक कल्याण अधिकारी नसल्याने माजी सैनिकांची मोठी गैरसोय

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाला जून २००६ पासून सैनिक कल्याण अधिकारी मिळाला नाही. त्यामुळे जिल्ह्यातील सैनिक व माजी सैनिक यांच्यासोबतच त्यांच्या पाल्यांनाही अनंत अडचणींना सामोरे जावे लागत आहे. वरिष्ठ पातळीवर अनेक वेळा संघटनेच्या वतीने निवेदन दिली, परंतु त्यांच्याही निवेदनाला वरिष्ठ कार्यालय दाद देत नसल्याने सैनिकांच्या पाल्य व कुटुंबीयांमधून संताप व्यक्त होत आहे.

नांदेड येथे सैनिकी मुलांचे वस्तीगृह, सैनिक विश्रामगृह व ईसीएचएस दवाखाना असल्याने येथे सैनिक कल्याण अधिकारी सतत उपस्थित असणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेता माजी सैनिकांनी संचालक यांच्याकडे तक्रार करून नांदेड येथीलच सैनिक कल्याण अधिकारी द्यावा असे सुचवले. यामुळे शासनाने निवासी उपजिल्हाधिकारी नांदेड महेश वडदकर यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सैनिक कल्याण अधिकारी म्हणून दिला. मागील दोन वर्षांपासून वडदकर हे सैनिक कल्याण अधिकारी म्हणून अतिरिक्त कार्यभार पाहत होते. परंतु कामाच्या व्यापामुळे त्यांना सैनिक कल्याण कार्यालयात येण्यास वेळ मिळत नव्हता. यामुळे सैनिकी मुलांचे वसतीगृह येथील मुलांची संख्या ही अवघी १५ झाली. बाहेरच्या तालुक्यातून येणारे माजी सैनिकांचे काम होत नव्हते. ध्वजनिधी जमा करणाऱ्या लोकांनाही निधी जमा करण्याचा त्रास होत होता. यामुळे संघटनेने शासनाकडे सैनिक कल्याण अधिकारी मिळावा याची मागणी केली आहे. तसेच कार्यालयात जो काही स्टाफ आहे तो फार कमी आहे. अधिकारी नसल्यामुळे त्यांना प्रकरणात स्वाक्षरी करण्याचाही अधिकार नाही. तरीही कसेबसे हे कर्मचारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी करून काम करत आहेत. परंतु किनवटसारख्या तालुक्यातून येणारे माजी सैनिकाचे कामे हे तात्काळ होत नाहीत. त्यांना पेन्शन लवकर मिळत नाही व कल्याणकारी योजनांचा लाभ आहे तोही लवकर मिळत नाही. माजी सैनिक सध्या त्रासून गेले आहेत. त्यामुळे जो कोणी अधिकारी अतिरिक्त असो किंवा कायमस्वरूपी असो त्यांनी सैनिक कल्याण कार्यालयात येऊन बसावे कमीत कमी दोन तास तरी कार्यालयास वेळ द्यावा इतर जिल्ह्याचा अधिकारी असल्यास त्यांनी आठवड्यातून दोन दिवस यावे, असे माजी सैनिकांचे म्हणणे आहे. सध्याच्या नियमानुसार निवासी उपजिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार आहे. कालच किरण आंबेकर यांनी निवासी उपजिल्हाधिकारी पदाचा पदभार घेतला. ते रुजू झाल्यामुळे माजी सैनिकांना आशा आहे की त्यांनी दररोज एक तरी तास सैनिक कल्याण कार्यालयामध्ये द्यावा, माजी सैनिकांशी प्रत्यक्ष संपर्क साधावा अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. किरण आंबेकर हे नांदेड येथे तहसीलदार व इतर पदावर राहिले असल्याने त्यांना माजी सैनिकांच्या अडचणी माहित आहेत. ते लवकरच कार्यभार सांभाळून माजी सैनिक यांना न्याय देतील अशी अपेक्षा आहे.

# लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे नांदेड जिल्हा जयंती मंडळ अध्यक्षपदी नागेश तादलापूरकर



**नांदेड (प्रतिनिधी)** – साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे १०५ व्या जयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी नागेश तादलापूरकर यांची निवड करण्यात आली आहे.

सार्वजनिक जिल्हा जयंती मंडळ व कार्यकारिणीची बैठक दि. ४ जुलै रोजी प्रा. देविदास इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली व संयोजक गणेश तादलापूरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यकारिणीची निवड करण्यात आली. तीत अध्यक्षपदी– अण्णाभाऊ साठे क्रांती आंदोलनाचे जिल्हाप्रमुख नागेश तादलापूरकर निवड करण्यात आली आहे. उर्वरीत कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी अंबादास भंडारे मिनकीकर, उपाध्यक्षपदी मारोती चिवळीकर, उपाध्यक्षपदी रोहन वाघमारे, भगवान जाधव, सचिन कपाळे तर सचिवपदी ईश्वर जाधव, सहसचिवपदी बंटी बारडकर, प्रा. मंगेश देवकांबळे गऊळकर, बंटी दुधकवडे आणि कोषाध्यक्ष पदी संतोष शिंदे यांची एकमताने झाली आहे.

यावेळी माजी जयंती मंडळाचे अध्यक्ष कॉ. गंगाधर गायकवाड, सूर्यकात तादलापूरकर, संजय गायकवाड, निलेश तादलापूरकर, सोनू वाघमारे, नागोराव आंबटवार, डॉ. मिलिंद शिकारे, साईनाथ जाधव, आकाश गवाले, इरवंत सूर्यकर, विलास जाधव, सचिन वाघमारे, उत्कर्ष भोसीकर, सचिन आंबटवार, प्रथमेश तादलापूरकर, अंकुश कांबले, माधव भुयारे, कृष्णा कंटेवार, ऋषिकेश तादलापूरकर, माणिक टोकलवाड, बजरंग पांडेवाद, विशाल रणदिवे, अजय शिंदे यांच्यासह शेकडो समाजबांधव उपस्थित होते.

# 'अंनिस'ची ३० सप्टेंबर रोजी बैठक

**नांदेड (प्रतिनिधी)**– अंधश्रद्धा निर्मूलन समितीची बैठक नांदेड येथे शुभारंभ मंगल कार्यालयात शनिवार दि. ३० सप्टेंबर आणि रविवार दि. १ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती अंनिस कार्यकारणी सदस्य सम्राट हटकर, मुक्ता दाभोलकर, अण्णा कडलास्कर, मिलिंद देशमुख, राहुल थोरात, नंदिनी जाधव, अशोक कदम, मुंजाजी कांबळे, डॉ. हमीद दाभोलकर, रामभाऊ डोंगरे, नंदिनी जाधव, प्रशांत पोतदार, राजीव देशपांडे, फारुख गवंडी, प्रकाश घादगिने यांनी दिली.

या राज्य कार्यकारिणी बैठकीचे उद्घाटन शनिवारी ३० सप्टेंबर रोजी सकाळी १० वा. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. प्रकाश मोगले यांच्या उपस्थितीत होणार आहे. सायं. ६ वाजता मानसोपचार तज्ज्ञ डॉ. हमीद दाभोलकर लिखित 'भावनिक प्रथमोपचार' या पुस्तकाचे प्रकाशन मानसोपचार तज्ज्ञ डॉ. दि. भा. जोशी यांच्या हस्ते आणि ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कँपस्‌चे प्राचार्य डॉ. विजय पवार यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. रविवारी १ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजता अंनिसच्या राज्यस्तरीय पुरस्कारांचे वितरण सुप्रसिद्ध साहित्यिक आणि मानसोपचार तज्ज्ञ डॉ. नंदकुमार मुलमुले यांच्या हस्ते होणार आहे. बैठकीचे संयोजन नांदेड अंनिसचे कार्यकर्ते इंजि. सम्राट हटकर, एड. प्रदीप नागापूरकर, प्रा. सुलोचना मुखेडकर, कमलाकर जमदाडे, प्रा. डॉ. शिवाजी कांबळे, इंजि. शंकरराव खरात, भगवान चंद्रे, नितीन ऐंगडे, रवी देशमाने, कपिल वाठोरे, दत्ता तुमवाड, भाऊराव मोरे, चित्ततोष करेवार आदी करीत आहेत.

# 'नांदेड के हुनरबाज' कार्यक्रमाचे आज सादरीकरण; 'चला हवा येऊ द्या' फेम सतीश कासेवार यांची उपस्थिती

**नांदेड (प्रतिनिधी)**– ज्यांच्या अंगी कला असूनही त्यांना आपली कला सादर करण्याची संधी उपलब्ध होत नाही, अशा कलाकारांसाठी ॲक्टिंग, डान्स सिंगिंग, मिर्मिक्री अशा अनेक प्रकारच्या कलांना वाव मिळवून देऊन कलाक्षेत्रात आपले भविष्य घडविता यावे, यासाठी नांदेड शहरामध्ये प्रथमच कला विश्व प्रतिष्ठान, नांदेड व सायन्स कॉलेज, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने झी मराठी, चला हवा येऊ द्या फेम मिर्मिक्री आर्टिस्ट सतीश कासेवार यांनी कलावंतांसाठी 'नांदेड के हुनरबाज' हा स्टेज उपलब्ध करून दिला आहे.



रविवार, दि. ६ जुलै रोजी सायन्स कॉलेज, नांदेड येथे 'नांदेड के हुनरबाज' हा कार्यक्रम सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत होणार आहे. हा कार्यक्रम प्रसिद्ध उद्योजक तथा या कार्यक्रमाचे संयोजक मारोतीराव कंठेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे.

या कार्यक्रमामध्ये दोन गट असणार आहेत. लहान मुलांचा गट वय वर्षे ५ ते १४ वयोगट तर मोठ्या व्यक्तींसाठी वय वर्ष १५ ते ५५ असा वयोगट असणार आहे. या कार्यक्रमामध्ये आपल्या वेगवेगळ्या कला सादर करण्याची सुवर्णसंधी आयोजक सतीश कासेवार यांनी उपलब्ध करून दिली आहे.

या कार्यक्रमासाठी नांदेड जिल्ह्यासह इतर कोणत्याही जिल्ह्यातील कलाकार आपली कला सादर करू शकतात. त्यामुळे कलाकारांनी आपली कला सादर करण्यासाठी हजेरी लावावी, असे आवाहन आयोजक झी मराठी, चला हवा येऊ द्या फेम मिर्मिक्री आर्टिस्ट सतीश कासेवार यांनी केले आहे.

## मुदखेडची पायल पवार एमपीएससी परिक्षेत राज्यात दुसऱ्या क्रमांकावर

**मुदखेड (प्रतिनिधी)**– मुदखेड येथील पायल सुरेश पवार हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोग परिक्षेत राज्यात दुसऱ्या क्रमांक पटकावला आहे. तिची सार्वजनिक बांधकाम विभागात असिस्टंट इंजिनियर म्हणून नियुक्त झाली आहे.



पायल पवार ही महाराष्ट्र लोकसेवा आयोग परिक्षेत राज्यात दुसऱ्या क्रमांक पटकवल्याबद्दल बाळासाहेब देशमुख बारडकर, मुख्याधिकारी शैलेश फडसे, दिलीप पवार, भाजपचे शहराध्यक्ष राम सिंग चव्हाण, माजी नगरसेवक उत्तम चव्हाण, गोविंद गोपलपल्ले, कैलास गोडसे, संजय आऊलवार, माजी नगराध्यक्ष राजबहादुर कोत्तावार, करीम खासाब, महंमद गौस, मोहन कवळे गणेश वडे, रमेश सावंत पत्रकार संघाचे संघटक संजय कोलते, जिल्हा सहसचिव ईश्वर पिन्नलवार आदींनी पायल पवार हिचे कौतूक केले आहे.

# दक्षता पथकामार्फत बोगस कामगार नोंदणीची चौकशी सुरू

**लोहा (प्रतिनिधी)** – जिल्हा तसेच तालुकास्तरावर सुविधा केंद्रांमार्फत महाराष्ट्र इमारत व बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदणी नूतनीकरण व लाभाचे अर्ज प्रस्ताव संगणक प्रणालीवर नोंदविण्यात आले. त्यामध्ये प्रचंड अनियमितता झाल्याच्या वाढत्या तक्रारीच्या अनुषंगाने राज्याच्या कामगार विभागाच्या वतीने चौकशीचे नुकतेच आदेश निर्गमित केले आहेत. चौकशी अंती दोषीविरुद्ध फौजदारी स्वरूपाची कार्यवाही करण्याचे आदेश देखील देण्यात आले आहेत. लोहा तालुक्यात संगणक नोंदणीकृत कामगारांची संख्या १७ हजार ८४४ असून लातूर जिल्ह्यातून आलेली त्रिसदस्यीय दक्षता पथकामार्फत चौकशी सुरू आहे. सदरील अहवाल वरिष्ठ कार्यालयास १५ जुलै पर्यंत सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत जिल्ह्यासह तालुकास्तरावर सुविधा केंद्राच्या माध्यमातून बांधकाम कामगारांची नोंदणी नूतनीकरण व लाभाचे अर्ज प्रस्ताव संगणक प्रणालीवर सादर केल्यावर तालुका सुविधा केंद्रातील कर्मचारी व नोंदणी अधिकारी यांच्या छाननी नंतर अर्ज मंजूर करण्यात येतो. सदरील पूर्ण प्रक्रिया निःशुल्क राबविण्यात येणे तसेच मंडळामार्फत देण्यात येत असलेले लाभ कोणतेही शुल्क न आकारता देणे बंधनकारक असताना बांधकाम कामगारांकडून आर्थिक मागणी झाली असल्याची आणि बोगस कागदपत्रे व दाखले तयार करण्यात येऊन लाभ दिल्याच्या प्रचंड तक्रारीच्या अनुषंगाने राज्याच्या कामगार विभागामार्फत बाहेर जिल्ह्यातील दक्षता पथकामार्फत चौकशी करण्याचे आदेश काढण्यात आले होते. नुकतीच लातूर जिल्ह्यातून त्रिसदस्यीय दक्षता पथक नांदेड जिल्ह्यात दाखल झाले असून दि. १० जुलै पर्यंत सादर पथक संपूर्ण चौकशी करून त्याचा पूर्ण आढावा दि. १५ जुलै पर्यंत वरिष्ठ कार्यालयास सादर करणार आहे. तसेच चौकशी दरम्यान दोषी आढळून आल्यास दोषीविरुद्ध फौजदारी स्वरूपाची कार्यवाही करण्यात येणार आहे. बांधकाम कामगार नोंदणीमध्ये पैशांची देवाण घेवाण होऊन मोठ्या प्रमाणात बोगस प्रमाणपत्र वाटप करणाऱ्या आणि लाभ मिळवून देणाऱ्या दलालांमध्ये चौकशी पथकाच्या तपासणीमुळे प्रचंड धडकी भरली असल्याचे दिसून येत आहे.

> लोहा तालुक्यात इमारत व बांधकाम कामगारांची सन २०२१ नंतरची संगणकीकृत संख्या १७ हजार ८४४ असून अद्याप तरी लोहा तालुक्यातून बोगस नोंदणी किंवा बनावट कागदपत्रे संदर्भात एकही तक्रार प्राप्त नाही. कुठलीही पूर्वसूचना न देता सदरील तपासणी पथक केंव्हाही येवून तपासणी करू शकते. आम्ही तपासणी पथकास संपूर्णपणे सहकार्य करू.
>
> **–नंदप्रसाद इंदुरकर** (तालुका व्यवस्थापक)
> बांधकाम कामगार मंडळ, तालुका सुविधा केंद्र, लोहा

# व्हिपीके उद्योग समूहाच्या वतीने ऊस पीक स्पर्धेत विजेत्या शेतकऱ्यास बुलेट मोटारसायकल भेट

**उमरी (प्रतिनिधी)**– कुसुमनगर वाघलवाडा कारखाना येथे व्हि पी के उद्योग समूहाच्या वतीने लागवड हंगाम २०२३–२४ मध्ये उच्चांकी ऊस उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ऊस पीक स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत सिंधी येथील शेतकरी बालाजी सदाशिव शिंदे यांनी एकरी ९१.५८३ मे. टन उत्पादन घेऊन स्पर्धेत प्रथम पारितोषिक प्राप्तीचा बहुमान मिळविला आहे. उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष मारोतराव पाटील कवळे गुरूजी यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.




सन २०२३–२४ या लागवड हंगामातील शेतकरी १ एकर जमिनीवर १०००१ या जातीचे ऊस रोप कारखान्यातर्फे घेऊन उसाची लागवड केली. हा ऊस आडसाली असून १५ ते १६ महिन्यांत तोड झाल्यानंतर त्याचे एकरी ९१ .५८३ मे. टन उसाचे उत्पन्न झाले. कवळे गुरुजी यांनी बोलल्याप्रमाणे प्रथम येणाऱ्या शेतकऱ्याला कुसुमनगर वाघलवाडा येथे हजारो शेतकरी बांधवाच्या उपस्थितीत बुलेट मोटारसायकल देऊन फेटा बांधून त्यांचा सन्मान करण्यात आला.

गुरुजींच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील शेतकरी हा आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला पाहिजे, या हेतूने गावोगावी सभा घेऊन शेतकऱ्यांना स्वतःच्या शेतीतून ऊस पिकाचे नियोजन कसे केले पाहिजे, खत मात्रा फवारणी बेसल डोसेस या गोष्टीमुळे शेतकरी ह्या भागात प्रगत होत आहे. तसेच या कार्यक्रमात अपघाती निधन झालेल्या ऊसतोड मजूराच्या वारसांना विमा कंपनीतर्फे ३ मजूर व १ कर्मचाऱ्यांना प्रत्येकी ३ लाख रुपयांचा धनादेश सुद्धा देण्यात आला. या कार्यक्रमाला संचालक गणेशराव पाटील कवळे, सीईओ संदीप पाटील कवळे, गणपतराव पाटील हासेकर, लक्ष्मणराव पाटील हरेगावकर, मधुकर पाटील बोळसेकर, माजी सरपंच पांडुरंग पाटील वाघलवाडेकर आदी उपस्थित होते.

# चंदेरी

## आराध्या बच्चनकडे ना स्मार्टफोन, ना सोशल मीडिया अकाउंट...

**गेल्या एका वर्षापासून अभिषेक बच्चन आणि ऐश्वर्या राय यांच्यात मतभेद असल्याच्या बातम्या येत होत्या. दोघे घटस्फोट घेणार आहेत, इथंपर्यंत अफवा पसरवल्या गेल्या. अभिषेक किंवा ऐश्वर्या दोघांनीही या वृत्तांवर उघडपणे काहीही सांगितले नव्हते. त्यामुळे शंका दाटल्या होत्या. पण नंतरच्या काळात सर्व चित्र स्पष्ट झाले होते.**

### ऐश्वर्याने घातलीये बंदी



अभिषेक बच्चनने आराध्याच्या चांगल्या संगोपनाचे सर्व श्रेय ऐश्वर्याला दिले आहे. आराध्याचे कोणतेही सोशल मीडिया अकाउंट नाही आणि तिच्याकडे फोनही नाही. ऐश्वर्याने आराध्यासाठी या सर्व गोष्टींवर बंदी घातली आहे, असेही त्याने सांगितले. अभिषेक म्हणाला, की मी सर्व गोष्टींचे श्रेय पूर्णपणे आराध्याची आई ऐश्वर्याला देऊ इच्छितो. मला स्वातंत्र्य आहे आणि मी माझे चित्रपट बनवण्यासाठी बाहेर जातो. पण ऐश्वर्या आराध्यासोबत खूप मेहनत करते. ती अद्भूत आणि निस्वार्थी आहे. आराध्या कोणत्याही सोशल मीडियावर नाही. तिच्याकडे फोन नाही. मला वाटते की ज्या पद्धतीने तिला वाढवले गेले आहे, त्यामुळे ती एक खूप कर्तव्यदक्ष मुलगी बनली आहे. ही तिची वैयक्तिक ओळख आहे. ती आमच्या कुटुंबाचा अभिमान आहे, असे अभिषेक म्हणाला. अभिषेक सध्या त्याच्या कालिधर लपटा चित्रपटासाठी चर्चेत आहे, जो ४ जुलै रोजी ओटीटी प्लॅटफॉर्म Z5 वर प्रदर्शित झाला होता. चित्रपटासोबतच अभिषेकचेही यामध्ये खूप कौतुक होत आहे.

## 'रामायण'मध्ये रवी दुबे लक्ष्मणाच्या भूमिकेत

अनेक दिवसांपासून रणबीर कपूर आणि साई पल्लवी यांच्या मुख्य भूमिका असलेल्या 'रामायण' या चित्रपटाची उत्सुकता लागून राहिली होती. अशातच या चित्रपटाची पहिली झलक प्रेक्षकांसमोर आली आहे. रणबीर कपूरच्या बहुप्रतीक्षित 'रामायण' चित्रपटाचा पहिला लूक प्रदर्शित झाला आहे. निर्माते नमित मल्होत्राने त्यांच्या इन्स्टाग्रामवर या चित्रपटाचा टीझर व्हिडीओ शेअर केला आहे. तीन मिनिटं आणि तीन सेकंदांच्या टीझरमध्ये चित्रपटातील पात्रांची पहिली झलक पाहायला मिळाली. या चित्रपटात रणबीर कपूर राम आणि अभिनेता यश रावणाच्या भूमिकेत दिसत आहे. लोकप्रिय टीव्ही अभिनेता रवी दुबे लक्ष्मणाची भूमिका साकारत आहे. रवी दुबेला लक्ष्मणाच्या भूमिकेत पाहताच त्याच्या चाहत्यांनी आनंद व्यक्त केला आहे.


'रामायण' चित्रपटात रवी आधी असेल की नाही, याबद्दल साशंकता होती. पण 'रामायण'च्या टीझरमध्ये रवी दुबेचं नाव पाहिल्यानंतर त्याच्या चाहत्यांनी आनंद व्यक्त केला आहे. तसंच अभिनेत्याचासुद्धा आनंद गगनात मावेनासा झाला आहे. याबद्दल त्याने टीझर शेअर करत त्याच्या भावना व्यक्त केल्या आहेत. त्याने म्हटले आहे, की पिढ्यानपिढ्या घडवणाऱ्या एका कथेचा भाग असणं, हा माझ्या आयुष्यातील सर्वात मोठा सन्मान आहे. राम विरुद्ध रावणाची अजरामर कहाणी असलेल्या नमित मल्होत्राच्या 'रामायण'मध्ये आपले स्वागत आहे. चला हा क्षण साजरा करूया आणि एकत्र येऊन या विलक्षण जगात पाऊल ठेवूया. त्याची पत्नी शरगुन मेहता हिनेही रवी दुबेचं कौतुक केलं आहे. शरगुनने तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर 'रामायण'चा टीझर शेअर केला आहे आणि असं म्हटलं आहे, की २०२६ मधील आगामी दिवाळीची वाट पाहणं माझ्यासाठी खूप महत्त्वाचं आहे. माझं हृदय आनंदानं भरून आलं आहे.

**विशेष मुलाखत** अभिनेता अर्जुन रामपाल

# हा मॉडेल, याला काय अभिनय येणार

## लोकांच्या टीकेला अभिनयाचा पुरस्कार घेऊन उत्तर दिले

**एकेकाळी सुपरमॉडेल असलेला अर्जुन रामपाल जेव्हा अभिनेता म्हणून चित्रपटांमध्ये पाऊल ठेवण्याचा प्रयत्न करत होता, तेव्हा त्याला दीर्घकाळ टीकांचा सामना करावा लागला, की मॉडेल्स अभिनय करू शकत नाहीत. मात्र गेल्या २५ वर्षांत अर्जुन त्याच्या अभिनय कौशल्याने तो समज खोटा ठरवला. त्याला रॉक ऑनसाठी सहाय्यक अभिनेत्याचा राष्ट्रीय पुरस्कार देखील मिळाला. आजकाल तो त्याच्या नवीन वेब सिरीज राणा नायडूसाठी चर्चेत आहे. त्याच्याशी ही खास बातचीत...**



**प्रश्न : तुमच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल बोलायचे झाले तर, एकीकडे तुम्ही अरिक (६ वर्षे) आणि अविक (२ वर्षे) सारख्या दोन मुलांचे वडील आहात आणि दुसरीकडे तुम्हाला महिका आणि मायरा सारख्या दोन लहान मुली आहेत, तुम्ही आयुष्याचा हा टप्पा कसा एन्जॉय करत आहात? काय आव्हाने आहेत?**

» **अर्जुन :** मला वाटत नाही की कोणतेही आव्हाने आहेत. मी माझ्या मुलांना देवाने दिलेली देणगी मानतो. मला वाटते की ती माझ्या आयुष्यातील अमूल्य भेट आहेत. मला माझी चारही मुले खूप आवडतात. आजच्या काळात लहान मुलांशी मैत्री करणे खूप महत्वाचे आहे. मी माझ्या मुलींशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवतो. मी लहान मुलांचे लाड करतो. आता तुम्ही या मुलाखतीदरम्यान ऐकले असेलच की एरिक वारंवार माझ्याकडे येत आहे आणि मला काहीतरी दाखवत आहे. म्हणून मी तेदेखील हाताळत आहे.

**प्रश्न : जेव्हा तुम्ही मॉडेलिंगमधून चित्रपटांमध्ये आलात, तेव्हा तुमचा पहिला चित्रपट मोक्ष बनवण्यासाठी ६ वर्षे लागली, तो काळ तुमच्यासाठी किती कठीण होता?**

» **अर्जुन :** जेव्हा मी माझा पहिला चित्रपट मोक्षचे काही वाईट सीन्स पाहिले तेव्हा मला स्वतःचा तिरस्कार वाटला. मला वाटले की मी कॅमेऱ्यासमोर इतका कडक का दिसतो. मग मी त्याचे विश्लेषण केले आणि मला आढळले की मॉडेल म्हणून आपल्याला कॅमेऱ्यासमोर एका विशिष्ट पद्धतीने चालण्याचे आणि पोझ देण्याचे प्रशिक्षण दिले जाते, परंतु जेव्हा तुम्ही चित्रपट करता तेव्हा तुम्हाला त्या पात्रात शिरावे लागते. तुम्हाला पुतळ्यासारखे उभे राहण्याची गरज नाही. ते वाईट सी पाहून मी ठरवले की मी अभिनयाच्या दिशेने पुढे जाईन, म्हणून मी मॉडेलिंगमधून निवृत्ती घेत असल्याचे जाहीर केले. तेव्हा मला माहीत नव्हते की मोक्ष बनण्यासाठी ६ वर्षे लागतील. मी मॉडेलिंग सोडले होते आणि माझे उत्पन्नाचे साधनही बंद झाले होते. तो खूप कठीण काळ होता. बऱ्याच वेळा माझ्याकडे घराचे भाडे भरण्यासाठी पैसे नव्हते, पण त्या काळाने मला खूप काही दिले. मला असे अनेक मित्र दिले, ज्यांची साथ दीर्घकाळ टिकली. त्यावेळी मी माझ्या कामाशी इतका जोडलेला होतो की सेटवर असताना मला आनंद वाटायचा. आजही जेव्हा मी सेटवर जातो तेव्हा मला एक वेगळाच आनंद मिळतो.

**प्रश्न : मॉडेल असल्याने, तुम्हाला अभिनय करता येत नाही अशी टीका कधी सहन करावी लागली? पण नंतर तुम्हाला राष्ट्रीय पुरस्कार देखील मिळाला (रॉक ऑनसाठी सहाय्यक अभिनेत्यासाठी)...**

» **अर्जुन :** माझ्यावर आणि माझ्या अभिनयावर टीका झाली तेव्हा खूप त्रास व्हायचा. सुरुवातीला, जेव्हा तुम्ही नवीन असता तेव्हा तुम्हाला प्रोत्साहनाची आवश्यकता असते, कारण त्यावेळी तुम्हाला स्वतःला असुरक्षित वाटते की तुम्हाला कसे काम करायचे हे माहित आहे की नाही? अशा परिस्थितीत, जेव्हा तुमचे काम वाईट म्हटले जाते तेव्हा मन खूप दुखावले जाते. तुम्ही वर्षभर एखाद्या चित्रपटावर कठोर परिश्रम करता, नंतर शुक्रवारी तुम्ही ते प्रेक्षकांच्या हाती सोपवता आणि प्रेक्षक ते नाकारतात तर तुम्ही खाली पडता, तुम्ही तुटता. मानसिकदृष्ट्या ते तुमच्यावर खूप परिणाम करते. सुरुवातीला, मी टीकाकारांसाठी एक पंच बॅग बनलो होतो. मी त्यांना जितके महत्त्व दिले तितके ते टीका करत. मग एक वेळ आली जेव्हा मी ठरवले की मी आता माझ्या पात्रांना महत्त्व देईन. मी टीकेची आणि माझ्याबद्दल काय बोलले जाते याची पर्वा करणे सोडून दिले. आम्ही कलाकार विनोदी किंवा जिम्नॅस्ट नाही. अभिनेत्याने त्याच्या कामाबद्दल प्रामाणिक असले पाहिजे आणि त्याच्या पात्राकडे पाहिले पाहिजे.

**प्रश्न : आधी मॉडेलिंग नंतर सिनेमा आणि आता ओटीटी, तुझ्यासाठी हा बदल कसा आहे?**

» **अर्जुन :** माझ्यासाठी, हा बदल फारसा काही नाही. माध्यम म्हणजे अभिनय. कामदेखील तेच आहे, लोकही तेच आहेत, दिग्दर्शक आणि कथा देखील कमी-अधिक प्रमाणात सारख्याच आहेत. फक्त एक गोष्ट वेगळी आहे की तुम्हाला तुमच्या पात्रावर काम करण्यासाठी जास्त वेळ मिळतो. आजकाल मी ओटीटीवर बरेच भारतीय आणि परदेशी कंटेंट पाहत आहे आणि मला असे आढळले आहे की ज्या शोमध्ये मजबूत पात्रे आणि कथा आहेत त्यांची पकड देखील मजबूत असते, म्हणून माझ्यासाठी ही मोठी गोष्ट नाही. मी माझ्या कारकिर्दीत कोणत्याही भूमिका केल्या आहेत, मी नेहमीच स्वतःला एक पात्र म्हणून पाहिले आहे. आता, ओटीटीवर बनवल्या जाणाऱ्या चित्रपटांमध्ये किंवा शोमध्ये, प्रेक्षकांना कलाकारांना नाही तर पात्रांना पहायचे असते आणि



अभिनेत्याने त्या पात्रांना न्याय दिला आहे की नाही हे देखील पहायचे असते, म्हणून माझ्यासाठी हा खूप चांगला काळ आहे, कारण मला ज्या प्रकारची पात्रे मिळू शकतात ती मला मिळत आहेत. वेब सिरीजसोबतच मी चित्रपटही करत आहे. लवकरच माझे चार चित्रपट प्रदर्शित होणार आहेत, ज्यामध्ये अब्बास-मस्तानचे दोन चित्रपट, हनी त्रेहानचा पंजाब ९५, संगीत सिवानचा ब्लाइंड गेम आणि अपर्णा सेनचा द रेपिस्ट यांचा समावेश आहे. धुरंधरचे चित्रीकरण अजूनही सुरू आहे. या सर्वांमध्ये, मला प्रतिमेसाठी नाही तर पात्रांसाठी कास्ट करण्यात आले आहे.

**प्रश्न : तुझी जोडीदार गॅब्रिएला तुला कशी पूरक आहे?**

» **अर्जुन :** ती माझ्या आयुष्यातील प्रेम आहे. ती मला प्रत्येक प्रकारे पूरक आहे. आमच्या दोघांच्या आवडीनिवडी सारख्या आहेत, त्यामुळे आम्ही खूप चांगले जुळतो. आम्ही एकत्र खेळ खेळतो, एकत्र वेळ घालवतो. तिच्यासोबत खूप मजा येते. पण मी या सर्व गोष्टींबद्दल जास्त बोलत नाही.

**प्रश्न : तुझ्या नव्या वेब सिरीज राणा नायडूमध्ये स्टार्सचा अक्षरशः मेळावा आहे. त्याचा भाग असताना, तुझ्या भूमिकेचे स्वरूप काय असेल याबद्दल मनात काही असुरक्षितता होती का?**

» **अर्जुन :** माझ्या कारकिर्दीकडे पाहिले तर, मी इंडस्ट्रीतील सर्व मोठ्या स्टार्ससोबत काम केले आहे. मी अनेक मल्टीस्टार कास्ट चित्रपट देखील केले आहेत, म्हणून मला कधीही असुरक्षितता वाटत नाही. एक अभिनेता म्हणून, जेव्हा तुम्ही पटकथा वाचत असता, तेव्हा तुम्हाला त्या वेळी ठरवावे लागते की मी या पात्राला न्याय देऊ शकेन का? त्यामुळे अभिनेता म्हणून मला काही भर पडेल का? त्यावेळी, तुम्ही तुमच्या दिग्दर्शकाशी भूमिकेबद्दल सर्व चर्चा करायला हवी. जर तुम्हाला काही कमतरता आढळली तर त्यावरही चर्चा करायला हवी, जेणेकरून सेटवर सर्वकाही स्पष्ट होईल. जेव्हा मला ही भूमिका ऑफर करण्यात आली तेव्हा मला हे पात्र खूपच गुंतागुंतीचे वाटले. दिग्दर्शक करण अंशुमनशी सर्व काही चर्चा केल्यानंतर मी त्याला सांगितले की जेव्हा तुम्ही लिहिता तेव्हा माझे पात्र अशा प्रकारे लिहा की ते साकारताना मला थोडे स्वातंत्र्य मिळेल.

**विशेष मुलाखत** अभिनेत्री श्रिया पिळगावकर

# स्टार किड असणे यशाची हमी नाही!

**बहुतेक स्टार किड्स त्यांच्या पालकांच्या नावांनी ओळखले जातात, परंतु श्रिया पिळगावकरने इंडस्ट्रीमध्ये स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. तिचे आई- वडील सचिन पिळगावकर आणि सुप्रिया पिळगावकर हे इंडस्ट्रीमध्ये मोठे नाव असले तरी, श्रियाने कधीही याला यशाची हमी मानले नाही. तिची खास मुलाखत...**



**प्रश्न : तू बहुतेकदा थ्रिलर प्रोजेक्टमध्ये काम केले आहे, तुला थ्रिलर स्टाइल आवडते का की तुला इंडस्ट्रीमध्ये अशाच प्रकारच्या ऑफर येत आहेत?**

**श्रिया :** खरं तर, मला रोमँटिक प्रेमकथा खूप आवडतात, (हसते) पण एक अभिनेत्री म्हणून मला बहुतेक थ्रिलर चित्रपटांच्या ऑफर आल्या आहेत, मग मी काय करावे. मला खरोखर रोमँटिक कॉमेडियन, प्रेमकथा, मला काही कॉमेडी करायची आहे, पण मला ते करण्याची फारशी संधी मिळाली नाही. मला वाटते की इंडस्ट्रीमध्ये एक टप्पा असतो जेव्हा एखाद्या स्टाइलला जास्त महत्त्व दिले जाते, म्हणून मला वाटते की सध्या रोमँटिक कॉमेडियन आणि कॉमेडीजपेक्षा जास्त थ्रिलर आणि नाटके बनत आहेत. पण मला आनंद आहे की मला वेगवेगळ्या भूमिका साकारण्याची संधी मिळाली आहे, मग ती वकील असो, सेक्स वर्कर असो किंवा पोलीस अधिकारी असो, त्यामुळे मला खूप काही शिकण्याची संधी मिळते.

**प्रश्न : आजकाल चित्रपटसृष्टीत कामाचे तास किती असावेत याबद्दल बरीच चर्चा होत आहे. हा मुद्दा आता दीपिका पदुकोणमुळे समोर आला आहे, परंतु यापूर्वीही यावर चर्चा झाली आहे. याबद्दल तुझे काय मत आहे?**

**श्रिया :** खरं तर, दीपिकाच्या बाबतीत असे म्हणण्याचे कारण पूर्णपणे वेगळे आहे. मला वाटते की कामाच्या तासांबाबतचे नियम तितके काटेकोरपणे पाळले जात नाहीत जितके ते असायला हवे होते. मी अजून अशा टप्प्यावर पोहोचलेली नाहीये जिथे मी म्हणू शकेन की मी इतके तास काम करेन किंवा इतके तास काम करणार नाही. पण मला हे समजते की विशेषतः बाळंतपणानंतर आणि जेव्हा तुम्ही आई असता तेव्हा ते क्षण जगण्यासाठी तेवढा वेळ काढणे महत्त्वाचे असते. येथे कोणतेही योग्य उत्तर नाही, परंतु निरोगी आणि व्यावसायिक जीवनासाठी वेळेची मर्यादा असणे महत्त्वाचे आहे. आपल्या इंडस्ट्रीत याबद्दल कोणतेही नियम आणि कायदे नाहीत आणि खरे सांगायचे तर, मला वाटत नाही की असे काही शक्य होईल. ते तुम्ही कोणत्या स्टार आहात यावर अवलंबून आहे. प्रत्येकासाठी कोणतेही लक्झरी नियम नाहीत. मला वाटते की दीपिका पदुकोणने जे म्हटले आहे ते चुकीचे नाही. तिच्या आयुष्यातील परिस्थिती आणि गरजांनुसार ते बरोबर आहे, तिला एक मुलगी आहे.

**प्रश्न : बऱ्याच दिवसांपासून स्टार किड्सवर चर्चा सुरू आहे. तुला त्याचा फायदा झाला आहे का, त्याबद्दल तुझे काय मत आहे?**

**श्रिया :** जर तुम्ही स्टार किड असाल तर तुम्हाला विशेषाधिकार मिळतो यात शंका नाही. पण ती मदत यशाची हमी नाही. मी इतर स्टार किड्सच्या प्रवासावर भाष्य करणार नाही. पण याचा अर्थ असा नाही की कोणताही विशेषाधिकार नाही, स्टार किड असणे हे माझ्यासाठीही एक विशेषाधिकार आहे, माझ्या वडिलांचा आणि आईचा अनुभव मला मदत करतो, पण शेवटी तुम्हाला स्वतःला सिद्ध करावे लागेल. आज शाहरुख खान, इरफान खान, अभय वर्मा, जयदीप अहलावत, या सर्व कलाकारांनी कोणत्याही चित्रपट पार्श्वभूमीशिवाय आपले नाव कमावले आहे. मग इंडस्ट्रीतील स्टार किड्स देखील आहेत. स्टार किड्समुळे तुम्हाला एक-दोन संधी मिळतील पण भविष्यात तुम्हाला सर्वकाही स्वतः करावे लागेल.

**प्रश्न : तुझ्या 'छल कपट' वेब सिरीजबद्दल सांग?**

**श्रिया :** ही एक मर्डर मिस्ट्री जॉनर वेब सिरीज आहे. मला वैयक्तिकरित्या लहानपणापासूनच हा प्रकार खूप आवडतो. मी पहिल्यांदाच पोलीस अधिकाऱ्याची भूमिका साकारत आहे. जेव्हा तुम्ही तो गणवेश घालता तेव्हा तुम्हाला एक वेगळ्या प्रकारची जबाबदारी, एक शक्ती जाणवते. मला ते करायला खूप मजा आली कारण ही कथा एका लग्नाच्या घरात एक खून झाल्याचे दाखवते, ती मित्रांचीही कथा आहे, त्यांच्यातील तणावाचीही कथा आहे आणि त्याच वेळी, माझ्या देविका राठोडची कथा देखील दाखवण्यात आली आहे.

# हिची नजर लागेल...

## माहीला बोलावत नव्हते डोहाळ जेवणाला!

**माही विज ही भारतीय टीव्ही इंडस्ट्रीतील प्रसिद्ध चेहऱ्यांपैकी एक आहे. तिने २०११ मध्ये टीव्ही अभिनेता जय भानुशालीशी लग्न केले. या जोडप्याने २०१७ मध्ये राजवीर आणि खुशीला दत्तक घेतले आणि २०१९ मध्ये त्यांनी आयव्हीएफद्वारे त्यांची मुलगी ताराचे स्वागत केले. माही विजने तिच्या प्रजननक्षमतेशी असलेल्या संघर्षाबद्दल आणि मातृत्वाच्या आव्हानांबद्दल उघडपणे सांगितले आहे. अलीकडेच, अभिनेत्रीने खुलासा केला की तिचे अनेक नातेवाईक आणि कुटुंबीय अंधश्रद्धेमुळे तिला बेबी शॉवरसाठी आमंत्रित करत नव्हते.**





माही विज म्हणाली, की ती तिच्या मित्रमैत्रिणी आणि कुटुंबातील बेबी शॉवर पार्ट्या साजरे करतानाचे फोटो पाहत असे. यावरून तिला कळायचे की तिला या कार्यक्रमांना आमंत्रित केले जात नाही. माहीने खुलासा केला की जेव्हा तिला प्रजननक्षमतेची समस्या होती तेव्हा तिला फक्त हीच गोष्ट त्रास देत होती. अभिनेत्री म्हणाली, की त्या नातेवाईकांची नावे मी सांगू शकत नाही, पण त्यांना वाटायचे की हिची नजर लागेल. लोकांना वाटायचे की मी वाईट नजरेची व्यक्ती आहे. याचा मला त्रास व्हायचा. लोकांची समजूत मला त्रास देत असे. कारण ती तशी नाही. माही विज आणि जय भानुशाली २०१७ मध्ये मुलगा-मुलगी दत्तक घेऊन पालक बनले. नंतर लग्नाच्या ८ वर्षांनंतर त्यांनी आयव्हीएफद्वारे मुलगी ताराला जन्म दिला. त्यांच्यासाठी हा प्रवास सोपा नव्हता, विशेषतः माहीसाठी, तिने खुलासा केला की तिला खूप भावनिक आणि शारीरिक वेदना सहन कराव्या लागल्या. माहीने असेही म्हटले की जेव्हा तिचे २६ व्या वर्षी जयशी लग्न झाले तेव्हा तिला आई व्हायचे होते. तथापि, ते होऊ शकले नाही आणि तिला आयव्हीएफवर अवलंबून राहावे लागले.

# नैसर्गिक आपत्तीमुळे ६३ जणांचा मृत्यू, ४० बेपत्ता

**शिमला (प्रतिनिधी) –** हिमाचल प्रदेशमध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे राज्यात भूस्खलन, ढगफुटी आणि पूरामुळे आतापर्यंत किमान ६३ जणांचा मृत्यू झाला आहे. तर ४० हून अधिक लोक बेपत्ता असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

राज्यात ७ जुलैपर्यंत सर्व जिल्ह्यांना अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. सर्वात जास्त नुकसान मंडी जिल्ह्यात झाले असून, येथील थुनाग, बगस्याड, करसोग आणि धरमपूर या भागांत मोठ्या प्रमाणात हानी झाली आहे. हिमाचल प्रदेशच्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे विशेष सचिव डी. सी. राणा यांनी सांगितले की, आत्तापर्यंत सुमारे ४०० कोटी रुपयांचे नुकसान नोंदवले गेले आहे. प्रत्यक्ष नुकसान यापेक्षा अधिक असण्याची शक्यता आहे. सध्या आमचा प्राथमिक भर बचाव, शोध आणि पुनर्संचयना यावर असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यात मंडी जिल्ह्यात सर्वाधिक १७ मृत्यू झाले असून कांगडा येथे १३, चंबामध्ये ६ आणि शिमला येथे ५ जण मृत्यूमुखी पडलेत. या व्यतिरिक्त बिलासपूर, हमीरपूर, किन्नौर, कुल्लू, लाहौल-स्पीती, सिरमौर, सोलन आणि ऊना जिल्ह्यांतूनही मृत्यूंची नोंद झाली आहे. त्यासोबतच राज्यात १०० हून अधिक जण जखमी झाले असून शेकडो घरे उध्वस्त झाली आहेत. तसेच १४ पूल वाहून गेले असून ५०० हून अधिक रस्ते बंद आहेत. त्याचप्रमाणे ५०० पेक्षा जास्त वीज ट्रान्सफॉर्मर्स बंद असून अनेक भागात अंधार आहे. सुमारे ३०० जनावरांचा मृत्यू झाला असून पिण्याचे पाणी आणि अन्नाचा तुटवडा आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी हिमाचलसह गुजरात, राजस्थान, उत्तराखंड आणि छत्तीसगड राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी संपर्क साधून एनडीआरएफ पथकांची तैनाती केली आहे. आवश्यकतेनुसार अधिक पथके पाठवली जातील, असे आश्वासन दिले आहे. केंद्र सरकारकडून शक्य ती सर्व मदत दिली जाईल असेही त्यांनी स्पष्ट केले. राज्य सरकार, एनडीआरएफ आणि स्थानिक प्रशासनांकडून शोध आणि बचावकार्य युद्धपातळीवर सुरु असून, हवामान खात्याने आणखी पावसाचा इशारा दिल्यामुळे परिस्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता आहे.

## ५ बसेस एकमेकांवर आदळल्या, ३६ यात्रेकरू जखमी

**जम्मु (प्रतिनिधी) –** अमरनाथ यात्रेला निघालेल्या भाविकांवर शनिवारी दुर्दैवी प्रसंग ओढवला. जम्मू आणि काश्मीरमधील रामबन जिल्ह्यामध्ये पाच यात्रेकरू बसची एकमेकांवर धडक होऊन तब्बल ३६ जण जखमी झाले आहेत. हा अपघात सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावरील चंद्रकूटजवळ घडला.

या बस जम्मू भगवती नगरहून दक्षिण काश्मीरमधील पहलगाम बेस कॅम्पकडे जाणाऱ्या ताफ्याचा भाग होत्या. ताफ्यातील एका बसचा ब्रेक निकामी झाल्यामुळे हा अपघात झाल्याचे सांगण्यात आले.

## नमामि गोदावरी अंतर्गत नदीचे प्रदूषण होणार कमी; सीएसआरबॉक्ससोबत सामंजस्य करार

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) –** गोदावरी नदीचे प्रदूषण कमी करण्यासाठी 'नमामि गोदावरी' कृती आराखड्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासनाने शुक्रवारी सीएसआर बॉक्स या संस्थेशी सामंजस्य करार केला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी ह्या करारावर स्वाक्षरी केली.

जिल्ह्यातील ज्या ज्या भागातून गोदावरी नदी वाहते व नदीशी प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या संबंधित प्रत्येक क्षेत्रात ही संस्था आपले कार्य करेल. यासाठी ही संस्था उद्योगांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून निधी उभारणार असल्याने वेगळा निधीही द्यावा लागणार नाही, असे जिल्हा प्रशासनाने नमूद केले. पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने नमामि गोदावरी नदी कृती आराखड्याच्या अंमलबजावणीस ३० एप्रिल २०२५ रोजी मान्यता देत तसा जीआर जारी केला आहे. त्यानुसार नाशिक ते नांदेड या महाराष्ट्राच्या हद्दीतील गोदावरी नदीच्या स्वच्छतेची प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

सीएसआर बॉक्स या संस्थेच्या मानसी दिवाण यांनी या वेळी या करारावर स्वाक्षरी केली. जिल्हाधिकाऱ्यांसह संस्थेचे जिल्ह्याचे समन्वयक कल्पेश मोहोड, उपजिल्हाधिकारी संगीता राठोड यावेळी उपस्थित होते. गोदावरी नदी ही नाशिक (त्र्यंबकेश्वर) येथे उगम पावून पुढे अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, नांदेड या जिल्ह्यांमधून वाहत तेलंगण राज्यात प्रवेश करते. राज्यात या नदीची लांबी ५०४ किमी आह या अभियानांतर्गत नदी काठावर असलेल्या नगरपालिका, ग्रामपंचायती येथे घनकचरा व्यवस्थापन, पाणलोट क्षेत्र विकास, जलसंधारण उपचार (जलपुनर्भरण, बांध बंदिस्ती इत्यादी) तसेच गाळ काढणे, जलस्त्रोतांचे बळकटीकरण करणे व यासाठी लोकसहभागासाठी जनजागृती करणे, असे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. शिवाय पाण्यासाठी गोदावरी नदीवर अवलंबून असलेल्या उद्योग, स्थानिक स्वराज संस्था, सिंचन व्यवस्था इत्यादी क्षेत्रात सांडपाणी व्यवस्थापन, पाण्याचा पुनर्वापर आदी विषयी गावनिहाय आराखडा तयार करण्यात येईल. तसेच दुष्काळ प्रवण व पूरप्रवण क्षेत्रांमध्येही जलोपचार राबविण्यात येतील, असे सांगण्यात आले.

## ४५० किलो मोरपिसे जप्त

### वनविभागाची मोठी कारवाई उत्तर प्रदेशचे आरोपी ताब्यात



**पुणे (प्रतिनिधी) –** उत्तर प्रदेशातील वेगवेगळ्या ठिकाणांहून मोरपिसांची तस्करी करणाऱ्या ११ संशयितांना वन विभागाने ताब्यात घेतले. त्यांच्याकडून चारशेहून अधिक किलो वजनाची मोरपिसे जप्त करण्यात आली आहेत. नरपतगिरी चौक परिसरात (सोमवार पेठ) ही कारवाई केली असून, त्यांच्यावर वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गेल्या काही वर्षांतील ही सर्वात मोठी कारवाई ठरली आहे.

श्रावणातील विविध सण, गणेशोत्सव, नवरात्रोत्सवासह गृहसजावटीसाठी मोरपिसांना सर्वाधिक मागणी असते. या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर मोरपिसे दाखल झाली. या दाखल झालेल्या मोरपिसांवर वन विभागाने कारवाई केली असून, सुमारे चारशे ते पाचशे किलो मोरपिसे जप्त करण्यात आली आहेत.

शहरात मोठ्या प्रमाणावर मोरपिसांची वाहतूक होणार असल्याची माहिती वन विभागाला मिळाली. त्याआधारे विभागाच्या फिरत्या पथकाच्या अधिकाऱ्यांनी विक्रेत्यांवर कारवाई केली. ताब्यात घेतलेल्या विक्रेत्यांकडे चौकशी केल्यानंतर आरोपींनी संत गाडगेबाबा धर्मशाळा येथील वसाहतीमध्ये मोराची पिसे विक्रीसाठी साठवत असल्याची माहिती दिली. त्यानंतर वन विभागाने घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, तेथे सुमारे चारशे ते पाचशे किलो मोरपिसे साठवले असल्याचे आढळले. हा मुद्देमाल आणि ११ आरोपींना ताब्यात घेऊन विभागाने कारवाईचा बडगा उगारला. जप्त केलेल्या मुद्देमालामध्ये सुट्टी मोरपिस, मोरपिसांच्या शोभेच्या वस्तू ताब्यात घेतल्या आहेत. पुणे वनविभागाचे मुख्य वनसंरक्षक आशिष ठाकरे, उप वनसंरक्षक महादेव मोहिते, सहायक वनसंरक्षक मंगेश ताटे यांच्या मार्गदर्शनाखाली वन परिक्षेत्र अधिकारी (फिरते पथक) हृषीकेश चव्हाण, वन परिक्षेत्र अधिकारी (भांबुर्डा) मनोज बारबोले, वन परिक्षेत्र अधिकारी सुरेश वरक आदींनी ही कारवाई केली.

## 'उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२४'साठी प्रवेशिका पाठविण्याकरिता मुदतवाढ

**मुंबई(प्रतिनिधी) –** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी, २०२४ ते ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत. प्रवेशिका पाठविण्याचा अंतिम दि. ३१ जानेवारी, २०२५ असा होता. आता या पुरस्कारासाठी प्रवेशिका मागविण्याकरिता दि. १९ जुलै, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२, येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. अर्जाचे नमुने http://dgipr.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

## लातुरमध्ये नेटवर्क मशीन्स चोरल्याप्रकरणी तिघांना अटक

**लातूर(प्रतिनिधी) –** चोर काय चोरतील काही सांगता येत नाही, साखळी चोर, मोबाइल चोरपासून तर बरेच आहेत पण लातूर जिल्ह्यामधील चोरांच्या टोळीने तर कहरच केला. त्यांनी मोबाईल टॉवर्समधून नेटवर्क मशीन्सच चोरले. याप्रकरणी पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे.

लातूर जिल्ह्यात मोबाईल नेटवर्कशी संबंधित एक मोठी चोरी उघडकीस आली आहे. किंगणव पोलिस स्टेशनच्या पथकाने मालवती रोड परिसरातील तीन तरुणांना अटक केली आहे, ज्यांच्यावर मोबाईल टॉवर्समधून नेटवर्क मशीन्स चोरल्याचा आरोप आहे. चोरी झालेल्या मशीन्सची किंमत सुमारे ७५,००० रुपये आहे. पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले की, अटक केलेल्या आरोपींची नावे अमोल भोसले (२२ वर्षे), संदीप गिरी (२३ वर्षे) आणि दत्तात्रेय केकन (३२ वर्षे) आहेत. या तिघांवर मोबाईल टॉवरमधून हाय-टेक नेटवर्किंग मशीन चोरल्याचा आरोप आहे आणि ते त्या विकण्याचा विचार करत होते.

### टी.सी हरवली

मुखेड तालुक्यातील राजुरा येथील दत्तात्रय गंगाधर इंगळे या नावाची बारावी पास टि सी असलेली बँग नांदेड ते मुखेड बस प्रवास करते वेळेस हरवली आहे त्यात महत्त्वाची इतर कागदपत्र पण होते तरी ज्यांना मिळाली असल्यास खालील नंबरवर संपर्क करा

**–संपर्क पत्ता–**
**दत्तात्रय गंगाधर इंगळे**
**या राजुरा ता मुखेड**
**९९७५७६२३७५**


### कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८


### जाहीर प्रगटन

**भुखंड गट नं. ५८ सुविधा भुखंड ३५१.५० मी. म्हाडा सहयोग नगर नांदेड बाबत. ई-लिलाव विक्रीमध्ये सहभागी न होणे बाबत.**

सर्व जनतेस सदरील भुखंडाबाबत सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार हुसेन खान अली खान रा.सना हायस्कुलच्या पाठीमागे शिवराय नगर तारोडा बु. नांदेड यांनी मा. जिल्हा न्यायाधिश-२ नांदेड ता.जि.नांदेड यांच्या न्यायालयात RCA नं. ६९/२०२५ हुसेन खान विरुध्द म्हाडा असे प्रकरण दाखल केले असुन सदरील प्रकरणाची पुढील तारीख २४/०७/२०२५ आहे तसेच सदरील भुखंडाबाबत मा. न्यायालयात प्रकरण प्रलंबीत आहे व सदरील भुखंडामध्ये माझ्या पक्षकराचे हित गुंतलेले आहे. म्हाडा कार्यालय औरंगाबाद यांनी ई-लिलावाव्दारे सदरील भुखंडाची विक्री करण्याची जाहीरात काढली आहे तरी सदरील भुखंडाबाबतच्या ई-लिलाव विक्री मध्ये कुणीही सहभागी होवू नये तसेच म्हाडा कार्यालयाने सुध्दा सदरील भुखंडाची ई-लिलाव विक्री त्वरीत रद्द करावी तसेच ई-लिलावा विक्री व्दारे भविष्यात माझ्या पक्षकारास नुकसान झाल्यास म्हाडा कार्यालय व ई-लिलावात सहभागी सर्वस्वी जबाबदार राहतील.करीता हे जाहीर प्रगटण दिनांक ३०/०६/२०२५

**मार्फत**
**ॲड.व्यंकटेश शिराढोणकर**
**मो.९८९०२८३३२१**

**जाहीर प्रगटन देणार**
**हुसेन खान अली खान**
**रा.सना हायस्कुलच्या पाठीमागे**
**शिवरायनगर तरोडा बु.नांदेड**
**मो.९३७३९५९३३३**

### टी.सी हरवली

माझी कावेरी रामराव आगलावे या नावाची १० वी पासची टि.सी. मुखेड ते नांदेड प्रवासादरम्यान हरवली आहे. कोणास सापडल्यास संपर्क करावे.

**संपर्क-कावेरी रामराव आगलावे मु. पो. वर्ताळा ता.मुखेड जि.नांदेड मो. ७८७५९३७१८६**

### जाहीर प्रगटन

माझे जुने नाव एसएससी गुणपत्रक लिस्टनुसार निरडे कुष्णा मारुती रा.कचारवाडी पोस्ट जोडहिंगणी बु. ता.धारूर जिल्हा बीड पिन ४३११२८ महाराष्ट्र असे आहे. मी असे जाहीर करतो की, माझे पाहिले नाव व आताचे नावात चुकून बदल झाला होता. तो मी दुरुस्त करण्यासाठी वृत्तपत्रात जाहीरात देत आहे. नवीन नाव कृष्णा मारुती निरडे आधार कार्ड, पॅन कार्ड प्रमाणे असे आहे.वरील दोन्ही नावाची मी एकच व्यक्ती आहे.करिता हे प्रगटन.

### टी.सी. हरवली


माझी रोहित भानुदास दुधमल या नावाची १२ वी (विज्ञान शाखा) पासची टी.सी. नांदेड ते वसमत प्रवासात हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

:: संपर्क ::
रोहित भानुदास दुधमल
रा. सुमेधनगर,
पूर्णा रोड, नांदेड
मो. ९५१८७ ७८६२२

### Change In Name

My Old Name Is ANITABAI WAMANRAO KULKARNI Wich now Iam changing as New Name ANITA WAMANRAO KULKARNI Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same. Sign By: ANITA WAMANRAO KULKARNI

Address: Matoshri Niwas Main Road Malkautha Tq Mudkhed Nanded 431806 Mb No: 9561184898

भारत स्वाभिमान न्यासचे नांदेड जिल्हाध्यक्ष तथा योग गुरु
यांना
श्रीमान रामजी शिवपनोर



'बिलोली तालुका भुषण पुरस्कार'
घोषित झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन अन् आभार!
आणि
गंगामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रमुख
बी. पी. नरोड तसेच संचालक मंडळाचे आभार

✽ शुभेच्छुक आणि आभारकर्ते ✽
नागनाथराव पाटील माचनुरकर
प्रभारी, किसान सेवा समिती, नांदेड

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षापासून नांदेडकरांच्या सेवेत...
किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी प्रभावीपणे काम करा -डॉ. किन्हाळकर

### राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आढावा बैठक संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** केंद्र आणि राज्यातील सरकार केवळ मुठभर लोकांना श्रीमंत करीत आहे. शेतकरी, शेतमजूर व सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांची भाजप सरकारला देणे-घेणे नाही. त्यामुळे कार्यकर्त्यांनी सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवून आगामी काळात होत असलेल्या नांदेड महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी प्रभावीपणे काम करावे, असे आवाहन माजी मंत्री माधवराव किन्हाळकर यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची नांदेड शहर व तालुका आणि उत्तर व दक्षिण विधानसभा मतदारसंघातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने दि. ५ जुलै रोजी राष्ट्रवादी शहर कार्यालयात बैठक संपन्न झाली. या बैठकीत मार्गदर्शन करताना किन्हाळकर बोलत होते. बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष डॉ. सुनील कदम तर प्रमुख पाहुणे मार्गदर्शक म्हणून माजी मंत्री माधवराव किन्हाळकर, जिल्हा अध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर, शीख सेलचे राज्यप्रमुख जरनेलसिंघ गाडीवाले, उपाध्यक्ष तातेराव पाटील आलेगावकर, बंटी लांडगे, सरचिटणीस प्रा. डी.बी. जांभरूणकर, गणेश तादलापूरकर, युवकचे जिल्हाध्यक्ष धनंजय सुर्यवंशी, शहराध्यक्ष रऊफ जमिनदार, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सिंधुताई देशमुख, विद्यार्थीचे अध्यक्ष फैजल सिद्धीकी यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना शहर जिल्हाध्यक्ष सुनील कदम म्हणाले, राष्ट्रीय नेते खा. शरदचंद्रजी पवार यांनी सर्वसामान्य नागरिकांसाठी अनेक धोरणे राबविली आहेत. सर्व समाज घटकासाठी ते अखंडपणे काम करतात. याची जाण कार्यकर्त्यांनी ठेवली पाहिजे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नांदेड शहरात गेल्या अनेक वर्षांपासून प्रभावीपणे काम करीत आहे. अनेकजण महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी इच्छुक आहेत. त्यामुळे ज्यांना सर्वसामान्य नागरिकांच्या समस्यांची जाण आहे, अशा कार्यकर्त्यांनी निवणुकीला सामोरे गेले पाहिजे. प्रत्येक कार्यकर्त्याने मनपाची निवडणूक आणि स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक स्वबळावर लढविण्याची तयारी ठेवली पाहिजे, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नांदेड शहर जिल्हाध्यक्ष डॉ. सुनील कदम यांनी व्यक्त केले.




तसेच यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर म्हणाले, आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. शरदचंद्र पवार यांनी नियोजन केलेले आहे. वरिष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड जिल्ह्यात बैठक घेतली जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची राजकीय ताकद जिल्ह्यात मोठी आहे. कार्यकर्त्यांनी अधिक जोमाने काम करण्याची गरज असून नांदेड शहर आणि नांदेड ग्रामीण असे दोन्ही पदाधिकारी समन्वय ठेऊन आगामी काळात होणाऱ्या जिल्हा परिषद, मनपा, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत राष्ट्रवादीचा झेंडा फडकवू असा विश्वास नांदेड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर यांनी व्यक्त केला.

## चिकनचे पैसे मागितल्यावरून एकावर प्राणघातक हल्ला

### उमरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** चिकन विकत घेणाऱ्याला दुकानदाराने पैसे मागितल्याचा राग आल्याने त्याच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला. ही घटना उमरी तालुक्यातील हुंडा तांडा येथे ३ जुलै रोजी सायंकाळी पाच वाजता घडली.




उमरी तालुक्यातील हुंडा तांडा येथे राहणारा पृथ्वीराज साईनाथ राठोड (वय २६) याचे चिकन विक्रीचे दुकान आहे. त्याच्या दुकानावर राव धानोरा बुद्रुक येथील ऋतिक अमृतराव सर्जे, लोकेश कुऱ्हाडे, निखिल गोविंद हदनुरे व इतर दोघेजण चिकन खरेदीसाठी गेले. चिकन विकत घेतल्यानंतर त्यांना दुकानदार पृथ्वीराज राठोड यांनी पैसे मागितले असता त्यांना राग आला. यातूनच राठोडच्या दंडावर, बरगडीवर जबर शस्त्राने वार केला आणि यात राठोड हा गंभीर जखमी झाला. त्यानंतर हे पाचही जण घटनास्थळावरून पसार झाले. जखमी अवस्थेत पृथ्वीराज राठोड याने पोलिसांना दिलेल्या फिर्यादीवरून उमरी पोलीस ठाण्यात वरील पाच जनांविरुद्ध प्राणघातक हल्ला आणि भारतीय हत्यार कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक पोपुलवार करत आहेत.




**नांदेड** : शहरातील भक्ती लॉन्स येथे सुरु असलेल्या गुरूतत्व प्रदीप नांदेड आयोजित १००८ श्री गुरूचरित्र सारामृत पारायण व श्री गुरूचरित्र कथामृत सप्ताहात आरती करताना आ. बालाजी कल्याणकर. यावेळी अ. भा. ब्राम्हण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निखील लातूरकर, सौ. संध्याताई कल्याणकर, प्रा. कैलास राठोड, बालासाहेब पांडे, रोहित पाटील, गिरीश जाधव, प्रभाकर पेटकर दिसत आहेत. (छाया : करणसिंह बैस)

## रंगली विठ्ठल नामाची शाळा; पीपल्स प्राथमिक शाळेत वारकरी दिंडीचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड एज्युकेशन सोसायटी संचलित पीपल्स प्राथमिक शाळेत वारकरी दिंडीचे आयोजन करण्यात आले. पंढरपुरात जसा भक्तीचा मेळा आषाढी एकादशी जमतो तसाच भक्ती मेळा पीपल्स हायस्कूल नांदेड येथे आषाढी एकादशीनिमित्त जमला. यामध्ये ८० विद्यार्थ्यांनी सुंदर अशी वारकरी वेशभूषा, कपाळी टिळा, गळ्यात टाळ, डोक्यावर तुलसी वृंदावन आणि मुखी विठू माऊली चे नाव असं साक्षात पंढरपूरची वारकरी दिंडी सोहळा पीपल्स प्राथमिक शाळेत साजरा करण्यात आला.

संपूर्ण वारकरी दिंडी गोकुळ नगर व शिवाजीनगर या भागात फिरवण्यात आली. याप्रसंगी चिमुकल्यांनी विठू नामाच्या



गजराने परिसर दणाणून टाकला. यावेळी शाळेतील प्रयोगशाळा सहाय्यक मोकाटे यांच्या शंख नादाने आणि त्यांनी सादर केलेल्या अभंगामुळे गोकुळनगर परिसरात भक्तिमय वातावरण तयार झाले होते.

वारकरी दिंडी सोहळयात विद्यार्थ्यांना शालेय समितीचे अध्यक्ष नौनिहालसिंह जहागिरदार यांच्या तर्फे प्रसादाचे वाटप करण्यात आले.

यावेळी शालेय समितीचे अध्यक्ष नौनिहालसिंह जहागीरदार, सायन्स कॉलेज प्राचार्य नाना शिंदे, शाळेचे मुख्याध्यापक नितीन सेलमोकर, पर्यवेक्षक प्रशांत चौधरी, जी. सी. मेंबर राहुल गोरे, व्ही. आर. चिलवरवार, मुख्याध्यापिका सोनाली केंद्रे, प्रफुलता फुलारी, सौ. सुरोशे, सौ. वाघमारे, भरणे, सौ. वाठोरे, सौ.पवार, श्रीमती हाटकर, माधव लुटे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## विजया कुलकर्णी यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** साईनगर हडको येथील ज्येष्ठ महिला विजया दत्तात्रय कुलकर्णी (वय ७८) यांचे दि.५ जूलै रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर रविवारी दि.६ रोजी सिडको येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात मुलगा, दोन मुली, जावई, नातू असा परिवार आहे. जिल्हा न्यायालयातील लिपीक प्रल्हाद कुलकर्णी यांच्या त्या आई होत.

## मोहन सूर्यवंशी यांचे निधन



**नायगांव बाजार (प्रतिनिधी)–** नरसी (ता. नायगाव) येथील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नगरातील ज्येष्ठ नागरिक मोहन गोविंद सुर्यवंशी (वय ७५) यांचे दि. ५ जुलै रोजी दुपारी ३ वाजता निधन झाले. त्यांच्यावर दि. ६ जुलै रोजी नरसी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात बहिण, भाऊ, पत्नी, तीन मुली आणि एक मुलगा असा परिवार आहे. विजय सुर्यवंशी यांचे ते वडील होत.

## अवैध गुटखा विक्री; माळाकोळी पोलिसात गुन्हा दाखल



**लोहा (प्रतिनिधी)–** माळाकोळी पोलीस ठाणे हद्दीतील आष्टूर येथे गुटखा विक्री करतांना ज्ञानेश्वर मनोहर बाबर याला ताब्यात घेण्यात आले. तसेच त्याच्याकडून ५३ हजार ६४० रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला. माळाकोळी पोलिसांनी दि. ५ रोजी ही कारवाई केली.

आष्टूर येथील ज्ञानेश्वर मनोहर बाबर (वय ३३) हा त्याच्या घरासमोर गुटखा व इतर तंबाखूजन्य पदार्थ विकत होते. माळाकोळी पोलिसांन कारवाई करीत विमल गुटखा व इतर साहित्य असा १५ हजारांचा गुटखा जप्त केला. तसेच या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. आश्विनी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि महेश मुळीक, पोलीस अंमलदार बजरंग कल्लेवार,शरदचंद्र चावरे, दत्तात्रय शेळके, नंदीम डांगे यांनी सदर कारवाई केली.

पोहेकाँ बजरंग कल्लेवार यांच्या फिर्यादीवरून गुरनं १२८/२०२५ कलम १२३,२७४,२७५ भारतीय न्याय संहिता सह कलम २६ (२), २७,३०(२) अ, ५९ अन्न सुरक्षा मानके २००६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## दारु पिऊन शांतता भंग करणाऱ्यांवर गुन्हा दाखल; रस्ता सुरक्षा पथकांकडून कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील सार्वजनिक ठिकाणी घडणाऱ्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी स्थापन केलेल्या नांदेड सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह अंतर्गत पथकाने दि. ३ जुलै व ४ जुलै रोजी शहरात सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन सार्वजनिक शांततेचा भंग करणाऱ्यांवर कडक कारवाई केली.

शहरातील पोलीस स्टेशन शिवाजीनगर सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक तीन मधील पोलीस अंमलदारांना पेट्रोलींग दरम्यान ज्योती टॉकीज परीसरात एक इसम हा मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळून आला. त्याच्यावर कलम ११०/११७ म. पो. कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच हद्दीतील दारूचे दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्स चेक करण्यात आले. तसेच इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोघांना अटक केली. त्यासोबतच पोलीस स्टेशन भाग्यनगर सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक एक व दोन मधील पोलीस अंमलदार यांना पेट्रोलींग दरम्यान अशोक नगर परीसरात २ इसम मद्यप्राशन करीत असतांना मिळून आले. त्यांच्यावर कलम ११०/११७ म. पो. कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच हद्दीतील दारूचे दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्स चेक करण्यात आले.

## शहर काँग्रेसकडून प्रभाग निहाय आढावा बैठकीला प्रारंभ

### सिडको प्रभागाची बैठक संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने शहर काँग्रेसकडून व्यापक नियोजन आखण्यात आले आहे. प्रभाग निहाय आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान काँग्रेस जिल्हाध्यक्ष तथा माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांच्या विशेष उपस्थितीत सिडको वाघाळा प्रभाग क्रं. विसची आढावा बैठक शुक्रवार दि.४ रोजी हडको येथे घेण्यात आली. यावेळी मनपा निवडणूकीच्या अनुषंगाने सखोल चर्चा करत संघटनात्मक कार्यक्रमाची आखणी करण्यात आली.

आगामी महानगरपालिका निवडणूकीच्या अनुषंगाने काँग्रेस कडून सुक्ष्म नियोजन केले जात आहे. शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने आता प्रभाग निहाय आढावा बैठकीचे आयोजित करण्यात आले आहे. दरम्यान काँग्रेस जिल्हाध्यक्ष हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांच्या मार्गदर्शनात, सिडको वाघाळा प्रभाग क्रं. २० ची आढावा बैठक शुक्रवार दि.४ रोजी हडको येथे घेण्यात आली.




यावेळी स्थानिक पदाधिकारी व वरिष्ठांमध्ये नियोजना संदर्भात सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी संघटनात्मक कार्यक्रमाची आखणी करण्यात आली.

प्रदेश सरचिटणीस राजेश पावडे, श्याम दरक, ज्येष्ठ नेते सुरेशदादा गायकवाड, मसुद खान, आनंद चव्हाण, बालाजी चव्हाण, शमीम अब्दुला, महेश देशमुख तरोडेकर, जे. पी. पाटील, मुंन्तजीब, शेर अली खान, अजीज कुरेशी, बापूसाहेब पाटील, सुरेश हटकर, सत्यपाल सावंत, गगन यादव, वाजीद अन्सारी, दीपक सिंग हुजिरिया, नसीमा खान, डॉ. करुणा जमदाडे, पी.एस. गवळी, भारती रणवाडे, वंदना मगरे, महेश शिंदे, ज्योती कदम, प्रसेनजित वाघमारे, डॉ. अशोक कलंत्री, लतिफ शेख, देविदास कदम, संजय कदम, शेख मोईन लाठकर, शंकर गव्हाणे, किशन रावनगावकर, माणिक श्रोते, देविदास कहाळेकर, अजय गालेवाड, भुजंग स्वामी, नरुद्दीन शेख, भगवान जोगदंड, आनंदा गायकवाड, शशिकांत जोंधळे, तुकाराम झडते, चित्ते मावशी, ढवळे मावशी आदीसह प्रभागातील सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

## तृतीयपंथीयांना एसटी प्रवासात ५० टक्के सूट देण्याचे आश्वासन

### डॉ. सान्वी जेठवाणी यांचा पुढाकार

**नांदेड (प्रतिनिधी) –** राज्यातील तृतीयपंथीय समुदायासाठी विविध अधिकार व कल्याण विषयक योजनांचा सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या डॉ. सान्वी जेठवाणी यांच्या पुढाकारामुळे एसटी प्रवासात ५० टक्के सवलत देण्याचा ऐतिहासिक निर्णय आता प्रत्यक्षात येत आहे. परिवहन मंत्री सदानंद सरनाईक यांनी यासंदर्भात महामंडळाच्या आगामी बैठकीत निर्णय घेतला जाईल, असे स्पष्ट केल्याने तृतीयपंथीयांसाठी नवा मार्ग खुला झाला आहे.



महाराष्ट्र राज्य तृतीयपंथीय हक्क व कल्याण मंडळ, झठज किन्नर आखाडा, आणि अध्यक्ष सप्तरंग सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून सक्रीय असलेल्या डॉ. सान्वी जेठवाणी यांनी राज्य शासनाच्या विविध विभागांना तृतीय पंथियांच्या समस्यांवर प्रभावी प्रस्ताव सादर केले आहेत.

डॉ. जेठवाणी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत प्रत्यक्ष भेट घेतली असून, विविध प्रलंबित मुद्द्यांवर बैठक आयोजित करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले आहे. डॉ. जेठवाणी यांनी नुकतेच राज्याचे नवीन मुख्य सचिव यांचे स्वागत करून तृतीयपंथीय प्रश्नांवर सहकार्याची विनंती केली.

या सर्व सकारात्मक घडामोडी डॉ. सान्वी जेठवाणी यांच्या सातत्यपूर्ण, जिद्दी आणि मुद्देसूद पाठपुराव्याचे फलित आहे. लवकरच तृतीयपंथीय समुदायाच्या उर्वरित मागण्यांवर देखील शासन निर्णय घेईल, अशी अपेक्षा समाजातून व्यक्त होत आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com